# NUTA BULLETIN

FORTNIGHTLY JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. ATI 263 *Licensed to post without prepayment No. ATI 10

YEAR : 26 ) 15th March 2001 ( No : 2

## "CANDIDATES HAVING HAD THE THEN REQUISITE MINIMUM QUALIFICATION AS WERE EXISTING AT THAT TIME"

## या वाक्याचा अर्थ सार्वजनिकरित्या समजावून सांगण्याची वेळ आलेली आहे

*नेट सेट बाबत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची भूमिका : १*

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS**

### महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने आपल्या दिनांक २८ मार्च १९९४ च्या बैठकीमध्ये पुढील ठराव मंजूर केलेला होता.

"**१९८९ ते १९९४ या काळामध्ये यथोचितरित्या निवड समितीसमोर जाऊन निवड झालेल्या व सेवेमध्ये असलेल्या प्राध्यापकांवर पूर्वलक्षी प्रभावाने राष्ट्रीय पात्रता परीक्षा लादणे, केवळ अन्यायाचेच नसुन उघडपणे बेकायदेशीरपणाचे सुद्धा आहे.** ही गोष्ट महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचा महाराष्ट्राच्या माननीय मुख्यमंत्र्याबरोबर, १८ जानेवारी १९८९ रोजी झालेल्या समझोत्याचा उघडउघड भंग करणारी असून २७.२.८९ चा शासन निर्णय व त्यावर आधारित मा. कुलपतींच्या सम्मतीने करण्यात आलेले परिनियम यातील तरतुदींचा भंग करणारी आहे. उक्त कालखंडामध्ये नियुक्त झालेल्या प्राध्यापकांची पदे भरतांना जाहिराती या विद्यापीठांनी मान्य करुन दिलेल्या होत्या, निवड समिती कायद्याप्रमाणे रचित झालेली होती त्यावर शासनाचे प्रतिनिधी नेमण्यात आलेले होते. **या नेमणूकांना विधीवत मान्यतासुद्धा प्राप्त झालेल्या आहेत. अशा रीतीने कायदेशीररित्या झालेल्या या नेमणुकांवर व ते पद धारण करणाऱ्या शिक्षकांवर आता मागाहून "नेट" लादण्याचा प्रयत्न मागे घेण्यात यावा अशी विनंती ही सभा महाराष्ट्र शासनास करित आहे.**

राष्ट्रीय पात्रता परीक्षेला संघटनेचा विरोध नाही ही गोष्ट स्पष्टपणे नमुद करण्यात येत असून महाराष्ट्रात अशी परीक्षा घेण्याची कोणतीही तयारी महाराष्ट्र शासनाने आजपावेतो केलेली नाही. १९ सप्टेंबर १९९१ च्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशनमध्ये सुद्धा "यथोचितरित्या रचित झालेल्या निवड समित्या मार्फत ज्यांची अगोदरच (१९.९.९१ पूर्वी) निवड झाली त्यांना हे रेग्युलेशन लागू रहाणार नाहीत" असे स्पष्टपणे नमुद करण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या २२ जुलै ८८ च्या सूचनांमध्ये व महाराष्ट्र शासनाच्या २७ फेब्रुवारी १९८९ च्या शासन निर्णयामध्ये 'शिक्षक' व 'उमेदवार' असा स्पष्ट फरक करण्यात आलेला आहे. रिफ्रेशर कोर्सेस शिक्षकासाठी असून राष्ट्रीय पात्रता परीक्षा ही उमेदवारासाठी आहे. उमेदवारासाठी असलेल्या अटी शिक्षकांवर लादणे सर्वस्वी गैर आहे"

******

*नेट सेट बाबत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची भूमिका : २*

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANIZATIONS**

*Para 6.1 & 6.2 of the*

## GENERAL SECRETARY'S REPORT - 1994

*Adopted by the MFUCTO E.C. in its meeting held on 8th July 1995 at Nashik vide item No. 5 and approved by the General Council of MFUCTO in its meeting held at Nashik on 9th July 1995.*

" **6.NATIONAL AND STATE ELIGIBILITY TESTS :**

6.1 In the 1987 All India agreement for revision of pay scales, the condition of clearing eligibility test by candidates was provided. **The AIFUCTO and MFUCTO are party to this and therefore, we welcome introduction of Eligibility test for candidates,** However, its introduction to teachers retrospectively as one by our Government from 1-4-1990 is not acceptable to MFUCTO. The MFUCTO has made it clear that eligibility tests are for candidates who want to become teachers, while Refresher courses are for teachers. In view of the poor percentage of passing NET/SET all over the country including in Maharashtra arising strictly due to arbitrary choice of syllabus and mode of examination, the MFUCTO has already rejected the said TESTS in the present form in which they are being conducted. The MFUCTO demands that the NET/SET in their present form be forthwith abolished and calls upon the government to replace it by new eligibility test keeping in mind the fact that these Tests are for candidates who are to become teachers and not research assistants. A total modification of the mode of examination, fee structure from Rs. 600/- to Rs. 100/- for SET, syllabi content, etc. is necessary.

6.2 The MFUCTO is committed to the protection of each and every teacher who may be affected by the arbitrary decisions of the government in respect of NET/SET and if called for, a State-wide agitation against the government's arbitrariness will have to be organised in this respect."

******

*नेट सेट बाबत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची भूमिका : ३*

# नेटसेट संबंधीच्या २२ डिसेंबर १९९५ च्या शासननिर्णयाबाबत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने दिनांक ७ जानेवारी १९९६ च्या बैठकीत मंजूर केलेला ठराव

"जोपर्यंत आपली पर्यायी व्यवस्था होत नाही, तोपर्यंत सिलेक्शन कमिट्यांची निवड प्रक्रिया फायनल राहील. इतकेच नव्हे तर "**२ वर्षानंतर त्यांना कन्फर्म करा**" असे चान्सलर महोदयांच्या मान्यतेचे स्टॅट्यूट आहेत ... माझे म्हणणे असे आहे की, जी टेस्ट आहे, ती रिक्रुटमेंटची एक वेगळी पद्धत आहे. ती पद्धत जोपर्यंत अंमलात येत नाही तोपर्यंत परिनियमानुसार झालेली रिक्रुटमेंट १०० टक्के लॉफूल आहे. माननीय चान्सलर यांच्या सहीने आपण ते ठरविले आहे, जो २७.२.८९ चा जी.आर काढला त्याप्रमाणे स्टॅट्यूट झालेले आहे. या सर्व ॲडर्व्हटाइजमेंट ॲप्रुव्ह झालेल्या आहेत. नियमाप्रमाणे त्या सर्व रिक्रुटमेंट परफेक्टली लॉफूल अशा झालेल्या आहेत. ज्या दिवशी आपण नवीन व्यवस्था, **नवीन अल्टरनेट अरेंजमेंट कराल त्या दिवसापासून ते लागू होईल. सुटेबली रिप्लेसड होईल,** अशी खरी गोष्ट आहे. यामध्ये आज सेवेत असलेले जे शिक्षक आहेत त्यांना मुदत वाढवून देण्याचा प्रश्न नाही. त्यांच्या नेमणूकपत्रामध्ये तसे नाही, त्यांना कधी तसे सांगितले नाही, जाहिरातीमध्ये तसे जाहीर केले नाही.... आज सेवेत असलेल्या लोकांना लागू होत नाही. कारण त्यांचे सिलेक्शन लॉफूल आहे, ते कंडीशनल नाही. लॉ-फुली कॉन्स्टीट्युटेड सिलेक्शन कमिटीच्यामार्फत चान्सलरांच्या स्टॅट्यूटप्रमाणे ते रिक्रूट झालेले आहेत. त्यांना कॉम्पीटन्ट ॲथारिटीची मान्यता आहे. त्यांना ते लागू होत नाही. **सेवेत असलेल्या लोकांना ते लागू करण्याचे आपण या २-४ महिन्यात आदेश काढले ते आपण केंव्हा मागे घेणार असा प्रश्न आहे. याचे माननीय मंत्री महोदय उत्तर देतील काय?**" एवढी माहिती विधानपरिषद सभागृहामध्ये ऐकून घेतल्यानंतर विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देतांना राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांनी "**यापूर्वी शिक्षक झालेले आहेत आणि त्यांना याची आवश्यकता नाही असे सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख सांगत आहेत. तर ती वस्तुस्थिती असेल तर त्यासंबंधीचा अपवाद करण्याची तयारी राहील.**" असे स्पष्ट आश्वासन गुरुवार दिनांक १७ मार्च १९९४ रोजी सभागृहामध्ये दिल्यानंतर "**नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण करण्याची दिनांक ३१.३.१९९६ ची मुदत या आदेशाव्दारे काढून टाकण्यात येत आहे.**" अशी तरतूद असलेला शासन निर्णय निर्गमित करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाला २१ महिन्याचा कालावधी लागावा **ही अत्यंत दुर्देवाची गोष्ट आहे.**

२. २२ मार्च १९९४ रोजी मा. मुख्यमंत्र्यांनी विधानभवनात या संबंधात बोलाविलेल्या बैठकीमध्ये महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने याबाबतची आपली **भूमिका पुढील शब्दात ठामपणे मांडली होती.** "१९८९ ते १९९४ या काळामध्ये यथोचितरित्या निवड समितीसमोर जाऊन निवड झालेल्या व सेवेमध्ये असलेल्या प्राध्यापकांवर पूर्वलक्षी प्रभावाने राष्ट्रीय पात्रता परीक्षा लादणे, केवळ अन्यायाचेच नसून उघडउघड बेकायदेशीरपणाचे सुद्धा आहे ही गोष्ट महाराष्ट्र प्राध्यापक संघाचा महाराष्ट्राच्या माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर, १८ जानेवारी १९८९ रोजी, झालेल्या समझोत्याचा उघडउघड भंग करणारी असून २७.२.८९ चा शासन निर्णय व त्यावर आधारित मा. कुलपतींच्या संमतीने करण्यात आलेले परिनियम यातील तरतुदींचा भंग करणारी आहे. उक्त कालखंडामध्ये नियुक्ती झालेल्या प्राध्यापकांची पदे भरतांना जाहिराती या विद्यापीठांनी मान्य करून दिलेल्या होत्या, निवड समिती कायद्याप्रमाणे रचीत झालेली होती. त्यावर शासनाचे प्रतिनिधी नेमण्यात आलेले होते. या नेमणुकांना विधीवत मान्यतासुद्धा प्राप्त झालेल्या आहेत. अशा रीतीने कायदेशीररित्या झालेल्या या नेमणुकांवर व ते पद धारण करणाऱ्या शिक्षकांवर आता मागाहून "नेट" लादण्याचा प्रयत्न मागे घेण्यात यावा. केंद्र शासनाच्या २२ जुलै ८८ च्या सूचनांमध्ये व महाराष्ट्र शासनाच्या २७ फेब्रुवारी १९८९ च्या शासन निर्णयामध्ये 'शिक्षक' व 'उमेदवार' असा स्पष्ट फरक करण्यात आलेला आहे. रिफ्रेशर कोर्सेस शिक्षकांसाठी असून राष्ट्रीय पात्रता परीक्षा ही उमेदवारांसाठी आहे. उमेदवारांसाठी असलेल्या अटी शिक्षकांवर लादणे सर्वस्वी गैर आहे."

३. २२ मार्च १९९४ रोजी मा. मुख्यमंत्र्यांनी बोलाविलेली बैठक सुरू होण्यापूर्वी वरील भूमिका स्पष्ट करणारे ९ मुद्यांचे लेखी टिपण महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य व विधानपरिषद सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी संघटनेच्या वतीने मा. मुख्यमंत्र्यांना सादर केले होते. या टिप्पणीची पोच असलेली प्रत आजही संघटनेच्या कार्यालयात उपलब्ध आहे. दिनांक २५ सप्टेंबर १९९५ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने मंत्रालयावर आयोजित केलेल्या मोर्चाच्या वेळी मा. उच्च शिक्षण मंत्र्यांना दिलेल्या निवेदनामध्ये ३१ मार्च १९९६ पर्यंत नेट सेट परीक्षा उत्तीर्ण करण्याचे परिपत्रक शासनाने मागे घेतले नाही तर संघटनेला आंदोलनाशिवाय पर्याय रहाणार नाही याची स्पष्ट जाणिव दिली होती. विद्यमान मा. उच्च शिक्षणमंत्री व मा. शिक्षण सचिव यांनी ६ नोव्हेंबर १९९५ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला चर्चेसाठी बोलाविलेल्या बैठकीच्यावेळी या सर्व मुद्यांचे पुनःकथन संघटनेच्या वतीने मा. मंत्रिमहोदयांसमोर करण्यात आले. या बैठकीचे जे एकतर्फी कार्यवृत्त मा. सचिवांनी नोंदविले आहे. त्याची प्रत संघटनेकडे पाठविण्यात आली असून या कार्यवृत्तात असे नमूद आहे की "**जे अधिव्याख्याता ३१ मार्च १९९६ पर्यंत नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होणार नाहीत त्यांना सेवेतून मुक्त करण्यात यावे. असे शासनाचे सध्याचे आदेश आहेत. तथापि त्यावर पुन्हा शासनाकडून जरूर तो विचार करण्यात येईल.**"

४. शासनाने **जरूर तो विचार** करून आता "नेटसेट बाबतचा २२ डिसेंबर १९९५ चा शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. या शासन निर्णयाची काळजीपूर्वक छाननी केल्यास असे दिसून येते की :-

**(अ)** नेटसेट बाबत शासनाची भूमिका विद्यापीठ अनुदान आयोगाच्या, तसेच केंद्र शासनाच्या धोरणाशी व महाराष्ट्र शासनाशी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचा जो समझोता झाला त्याच्याशी पूर्णपणे विसंगत होती याचा कबुलीजबाबच या २२ डिसेंबर १९९५ च्या शासन निर्णयाने दिलेला आहे. **"नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण करण्याची दिनांक ३१.३.१९९६ ची मुदत या आदेशाव्दारे काढून टाकण्यात येत आहे."** हा शासन निर्णयाच्या परिच्छेद ७ (अ) मधील उल्लेख म्हणजे एमफक्टोने याबाबत घेतलेली भूमिका किती बिनचूक होती याचा पुरावाच आहे. तथापि **तदर्थ स्वरूपाच्या नेमणुका देणे, सेवेत असलेल्या अधिव्याख्यात्यांना नेट सेट परीक्षा उत्तीर्ण होण्याची सक्ती करणे, न झाल्यास वार्षिक वेतनवाढ देण्यात न येणे, त्यांची सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विचारात न घेणे, सेवा ज्येष्ठता न देणे या शासन निर्णयातील अटी संपूर्णपणे समझोत्याच्या व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या व केंद्र शासनांच्या सूचनांच्या विरुद्ध आहेत.** त्यामुळे या अटी ताबडतोब मागे घेण्यात याव्या अशी मागणी ही सभा करीत आहे.

**(ब)** केंद्र शासनाच्या २२ जुलै ८८ च्या सूचनांमध्ये व महाराष्ट्र शासनाच्या २७ फेब्रुवारी १९८९ च्या शासन निर्णयामध्ये 'शिक्षक' व 'उमेदवार' असा स्पष्ट फरक करण्यात आलेला आहे. रिफ्रेशर कोर्सेस शिक्षकांसाठी असून राष्ट्रीय पात्रता परीक्षा ही उमेदवारांसाठी आहे. उमेदवारांसाठी असलेल्या अटी शिक्षकांवर लादणे सर्वस्वी गैर आहे." या महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या भूमिकेचा पुनरूच्चार करण्यात येत आहे.

**(क)** "नेट सेट परीक्षा ३१ मार्च १९९४ पर्यंत उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा" असा आदेश **पहिल्या सोमवारी** काढावयाचा, "३१ मार्च १९९५ पर्यंत नेट सेट परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा" असा आदेश **दुसऱ्या सोमवारी** काढावयाचा व "३१ मार्च १९९६ पर्यंत नेट सेट परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा" असा आदेश **तिसऱ्या सोमवारी** काढावयाचा **या स्वतःवर लादून घेतलेल्या विक्षिप्त प्रकारातून उच्च शिक्षण विभागाची आता मुक्तता झालेली आहे ही आनंदाची गोष्ट आहे.**

**(ड)** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या व केंद्र शासनाच्या सूचनांच्या आधारावर झालेल्या **समझोत्याचा भंग करणाऱ्या कोणत्याही अटी स्वीकारण्यास हे कार्यकारी मंडळ ठाम नकार देत आहे.**

**(इ)** कोठारी कमिशनचा अहवाल, डॉ. राधाकृष्णन कमिशनचा अहवाल, सेन समितीचा अहवाल, मेहरोत्रा समितीचा अहवाल, यातून राष्ट्रीय पातळीवर स्थिर झालेल्या विचारमंथनाशी या अटी पूर्णपणे विसंगत असून **उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे हे संपूर्णपणे "लोकल प्रॉडक्शन" आहे ही गोष्ट जाहीर पणे नमूद करणे आवश्यक वाटते.** केंद्र शासनाच्या व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचना यांच्याशी या अटी पूर्णपणे विसंगत आहेत.

**(फ)** तदर्थ स्वरूपाच्या नेमणुका देण्याला राजमान्यता प्रदान करून उच्च व तंत्रशिक्षण विभागाने इतिहासाचे काटे उलटे फिरविलेले आहेत. **अगोदरच शिक्षण क्षेत्रामध्ये फार मोठ्या प्रमाणावर चाललेल्या दुकानदारीला व भ्रष्टाचाराला "युरिया, सुफला व सुपर फॉस्पेट" या दर्जाचे "तदर्थ नेमणुकांचे" रासायनिक खत पुरविण्याच्या या निंद्य प्रकाराची जेवढी करावी तेवढी निर्भत्सना थोडीच आहे.**

******

*दिनांक १५ एप्रिल १९९८ च्या 'नुटा बुलेटीन'मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेला पुढील लेख जसाच्या तसा पुनर्मुद्रित करण्यात आला आहे.*

*पुन्हा एकदा नेट सेट*

# शासकीय अधिकाऱ्यांच्या गलथानपणाची शिक्षा शिक्षकांनी का म्हणून भोगायची ?

**प्रा.बी.टी.देशमुख,** *विधान परिषद सदस्य*

१. राजकीय नेते येतात आणि जातात पण एकदा राज्यातील सर्वोच्च राजकीय नेतृत्वाच्या पातळीवर विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसारची ही "समग्र योजना" महाराष्ट्रात अमलात आणण्याचा धोरणात्मक निर्णय झाल्यावर त्यांची इमानेइतबारे अम्मलबजावणी करणे हे नोकरशाहीचे काम होते. नेटसेटबाबत नेमके हेच झालेले नाही. **शासकीय अधिकाऱ्यांनी करून ठेवलेल्या गलथानपणाची शिक्षा महाराष्ट्रातील हजारो शिक्षकांनी भोगावी ही या नोकरशाहीची इच्छा पूर्ण करण्यास महाराष्ट्र प्राध्यापक संघाने संपूर्णपणे नकार दिला असून** नेटसेट बाबतच्या संपूर्णपणे बेकायदेशीर व्यवहारामुळे प्राध्यापकांत निर्माण झालेल्या तिव्र असंतोषाला राज्यात मुख्यमंत्री व उच्च शिक्षण मंत्री तोंड देत असतील तेव्हा पुन्हा ही नोकरशाही गालातल्या गालात हसण्यास मोकळी असेल. **मंत्रालयातील नोकरशाहीने कितीही चुका केल्या, कितीहि नियमबाह्य व बेकायदेशीर वर्तन केले तरी त्याचा भोग त्यांना भोगावा लागत नाही हा आजच्या आमच्या व्यवस्थेचा मोठा गमतीदार भाग आहे.** नेट सेट बाबत काय ठरले होते? नोकरशाहीने करायला पाहिजे होते ते करण्याचे सातत्याने टाळले व करायला नको त्या गोष्टी करण्याचा सातत्याने सपाटा लावला. याबाबतची तपशीलवार माहीती पुढील परिच्छेदातून दिलेली आहे.

२. महाराष्ट्र शासनाच्या वतीने मा. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीमध्ये महाराष्ट्र प्राध्यापक संघाशी ११ जानेवारी ते १८ जानेवारी १९८९ या कालखंडात झालेल्या चर्चेच्या शेवटी जे मतैक्य पत्र नोंदविण्यात आले त्याच्या पहिल्याच परिच्छेदात असे नमूद आहे की :-

"The Government of India's suggestions on revision of pay scales for teachers in Universities and Colleges dated 17th June, 1987 as amended by subsequent agreement dated 4th and 5th Sept., 1987 and Govt. of India's suggestions dated 22nd July, 1988, would be implemented by the State Government with the recommended scales of pay, including the element of promotion involved therein as a composite scheme w.e.f. 1.1.1986" केंद्र शासनाची व्यवस्था **एक समग्र योजना** म्हणून अमलात आणण्याचे शासनाने एकदा मान्य केल्यानंतर प्रत्यक्ष शासन निर्णय २७ फेब्रुवारी १९८९ ला निर्गमित झाला.

**३. नेट सेटबाबत शासनाने आज घेतलेली भूमिका ही मूळ विद्यापीठ अनुदान आयोगाच्या योजनेशी व शासन आणि महाराष्ट्र प्राध्यापक संघ यांच्यामध्ये झालेल्या समझोत्याच्या संपूर्णपणे विरोधात आहे** हे स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. केंद्र शासनाच्या २२ जुलै १९८८ च्या मूळ परिपत्रका सोबतच्या परिशिष्टाच्या परिच्छेद ११ मध्ये "माध्यमा" चा अतिशय स्पष्ट उल्लेख आहे तो पुढील शब्दात :- "Only those candidates who, besides fulfilling the minimum acadamic qualifications prescribed for the post of lecturer, have qualified in a comprehensive test to be specially conducted for the purpose, will be eligible for appointment as lecturers. The detailed scheme for conducting the test including its design, the agencies to be employed in the conduct of tests, contents, administration, etc, will be worked out by the UGC, Keeping in view the requirements of the **media of intruction** followed by the different states/universities/ Colleges and other relevant consideration" केंद्र शासनाच्या २२ जुलै १९८८ च्या मूळ परिपत्रकाच्या परिच्छेद ३ (५) मध्ये पुढील उल्लेख स्पष्ट पणे दिसून येतो :-

"The qualifying test **for recruitment of lecturers** is intended to be organised through a number of agencies keeping in view the requirements of the media of instruction by different states/Universities." उपरोक्त राष्ट्रीय पात्रता परीक्षा ही त्या त्या राज्यांमध्ये व विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षणामध्ये कोणत्या माध्यमाचा वापर केला जातो हे लक्षात घेवून वेगवेगळ्या संस्थांनी (Number of Agencies) आयोजित करावयाची आहे.

४. ह्या पात्रता परीक्षा विविध माध्यमातून आयोजित करावयाच्या आहेत. महाराष्ट्र शासनाच्या मुळ निर्णयाच्या (२७.२.८९) परिच्छेद ९ मध्ये माध्यमाचा उल्लेख अतिशय स्पष्टपणे नमूद आहे. तो पुढील शब्दात : -

9. Only those candidates, who, besides fulfilling the minimum qualifications prescribed for the post of a lecturer, Librarian and Physical Education Staff, have qualified in a comprehensive test to be conducted for the purpose will be eligible for appointment. The detailed scheme for conducting the test including its design, the agencies to be employed in the conduct of the test, content, administration etc. will be worked out by the University Grants Commission keeping in view the requirement of the **media of instruction** followed by the different Universities and Colleges and other relevant considerations. २७ फेब्रुवारी १९८९ च्या शासननिर्णयामध्ये पुढे असाही स्पष्ट उल्लेख आहे की : "For Purposes of recruitment to the post of Lecturer /Librarian/Director/Instructor of Physical Education in Colleges and Principals of Colleges, the composition of the Selection Committee has already been laid down in Appendix, accompanying Government Resolution, Education and Youth Services Department No. USG 1177/129387/ XXXII (Cell), dated 25th October, 1977, **The same procedure should continue to be in operation till it is suitably replaced by the comprehensive test to be prescribed by the University Grants Commission."**

विद्यापीठ अनुदान आयोगाने माध्यमासह सर्व तपशील ठरविल्यानंतर जी "निवडीची प्रक्रिया पात्रता परीक्षेसह" (यापुढे नवी व्यवस्था असे म्हणू) येईल ती १९७७ च्या शासन निर्णयांनी विहित केलेल्या "विद्यमान निवड प्रक्रियेला" (यापुढे विद्यमान व्यवस्था असे म्हणू) "सुटेबली रिप्लेसड" करील असे शासन निर्णयात नमूद आहे. विद्यमान व्यवस्था (निवड प्रक्रिया) सुटेबली रिप्लेसड झाली काय? हा आजचा खरा प्रश्न आहे व त्याचे उत्तर "नाही" हेच आहे.

५. विद्यमान व्यवस्था निकालात निघून निवड करण्याची नवीन व्यवस्था स्थापीत करण्यासाठी काय कृती करावी लागेल याबाबतच्या तपशीलवार सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने महाराष्ट्र शासनाला दिलेल्या होत्या. दिनांक १४ मार्च १९९१ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाचे सचिव श्री. वाय.एन. चतुर्वेदी यांनी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण खात्याच्या सचिवांना एक पत्र (D.O.No. F.4-12/86 NET) पाठविले त्या पत्रात त्यांनी पुढील सूचना स्पष्टपणे दिलेल्या आढळून येतात :-

"We have not so far received acceptance from your state for setting up such state/regional test. For ensuring acceptable standard of those who get selected as Lecturers in colleges/Universities, setting up such a facility is essential and it would be appropriate that there is no delay in this regard. Specifically the following actions are required" असे नमुद करून ज्या ५ गोष्टी सांगीतल्या त्यामध्ये दुसऱ्या क्रमांकावर "2. Amendment of relevant university statutes for prescribing this as a minimum qualification." ही अट नमुद आहे.

६. १४ मार्च १९९१ च्या या पत्रावर महाराष्ट्र शासनाने कोणतीही कारवाई केली नाही. शेवटी ७ ऑगस्ट १९९१ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सचिवांनी पुन्हा एकदा महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण सचिवांना

दिनांक ७ ऑगस्ट १९९१ रोजी एक अर्धशासकीय पत्र (डी.ओ.नं. एफ.४-१२/८६ नेट) लिहून "तुमच्या राज्यात सेटची व्यवस्था करा याबाबतच्या माझ्या १४ मार्च १९९१ च्या पत्राला तुम्ही अजून काहीही उत्तर दिले नाही." (We have not heard from you in this regard so far, I will be grateful if you would please adivse of the action taken in the matter so far) असे कळविले. या रिमाईंडर नंतरसुद्धा आमच्या उच्च शिक्षण मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी कोणतीही कारवाई केली नाही.

७. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षांनी ३ जुन १९९२ रोजी महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण मंत्र्यांना नावानिशी पत्र लिहिले. या पत्रात त्यांनी असे नमुद केले की :- "Identification of a suitable examining body in the state and entrusting it with the responsibility of developing and accrediting the test with the UGC and then to hold state level NET once or twice a year. UGC has been urging the State Governments and the universities to set up such a mechanism. **This was discussed and there was general agreement about the desirability of such a system in the conference of Education Secretaries of the State Governments in April, 1992."**

८. वारंवार युजीसीच्या सचिवांनी महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण सचिवांना पत्र लिहून काहीही उपयोग होत नव्हता, तेव्हा विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष असलेल्या प्रा. जी.राम रेड्डी यांनी महाराष्ट्राचे शिक्षण मंत्री असलेल्या अनंतराव थोपट्यांना व्यक्तीशः उपरोक्त पत्र लिहून एका अर्थाने अशी तक्रारच केली की "९२ च्या शिक्षण सचिवांच्या अखिल भारतीय बैठकीमध्ये ठरल्यानंतर सुद्धा तुमचे सचिव काहीच कृती करीत नाहीत" आता शेवटी मी तुम्हाला हस्तक्षेप करण्याची विनंती करीत आहे. असे हताश उद्‌गार पुढील शब्दात काढले आहेत :- "I am writing this letter to seek your intervention in the matter for ensuring that the mechanism of UGC-NET State-NET becomes operational **and is prescribed in university's statutes/recruitment rules for Government Colleges at the earliest.**"

९. बिचारे अनंतराव थोपटे तरी काय करणार? त्यांनी ते पत्र पुन्हा सचिवांच्याच ताब्यात दिले. ४-५ महिने हे पत्र नुसते सचिवालयात पडून होते. त्यावर काही कारवाई झाली नाही. शेवटी कारवाई काय झाली तर ही "लचांड" उच्च शिक्षण संचालकाच्या गळ्यात बांधण्यात आली. मंत्रालयात एक बरे आहे. मंत्रालयात बसून अधिकार ते गाजविणार, आणि सेटची व्यवस्था करण्याचा नेट लागला की घोंगडे अडकविणार उच्च शिक्षण संचालकांच्या गळ्यात, उच्च शिक्षणसंचालकांनी मात्र तत्परतेने आपला "सेटबाबतचा प्रस्ताव" १५ जानेवारी १९९३ च्या पत्रान्वये शासनाला सादर केला.

**१०.** गंमतीची गोष्ट अशी की "सेट परीक्षा घेण्यासाठी १ चपराशी धरून एकूण ५ पदे" पुणे विद्यापीठाला मंजूर करण्याचा उपप्रस्ताव उच्च शिक्षण संचालकांच्या प्रस्तावामध्ये अंतर्भूत होता. **ही साधी ५ पदे तेथल्या तेथे मंत्रालयीन अधिकाऱ्यांना वित्त विभागाकडून मंजूर करवून घेता आली नाहीत.** आम्ही सभागृहामध्ये चर्चा उपस्थित केल्यानंतर, मुख्यमंत्र्यांनी चर्चेत हस्तक्षेप केल्यानंतर मग यांना आमच्या प्रयत्नामुळे वित्त विभागाने मंजुरी दिली. १५ जानेवारी १९९३ रोजी उच्च शिक्षण संचालकांनी सादर केलेल्या सेटच्या प्रस्तावाबाबत १९९३ या वर्षभर काहीही फलनिष्पत्तीची कारवाई मंत्रालयात झाली नाही. सभागृहात रणकंदन झाल्यावर ८.४.९४ ला वित्त विभागाची मान्यता मिळली व मग १४ जुलै १९९४ ला "सेट परीक्षा घेण्याची गरिबीची महाराष्ट्रातील एकमेव यंत्रणा" म्हणून पुणे विद्यापीठाला घोषित करणारा शासन निर्णय निर्गमित झाला. सेट परीक्षा घेण्यासाठी ५ पदांना मंत्रालयाची मंजूरी मिळविण्यास मंत्रालयाला १५ महिने लागले याची शिक्षा शिक्षकांना कशी देता येईल?

**११.** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सचिवांनी दरम्यान १५ जून १९९३ रोजी महाराष्ट्र राज्याच्या उच्च शिक्षण सचिवांना पत्र (डी.ओ.नं. एफ.४-२/९० नेट) लिहून "**University Statutes must be amended to reflect teacher's qualifications and eligibility requirements prescribed in UGC Regulations.**" अशी विनंती केली. याच पत्राच्या शेवटी त्यांनी पुन्हा महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण सचिवांना असा स्पष्ट इशारा दिला की "I wish to again point out that **unless an accredited state level NET is set up, University Statutes and Government college recruitment rules are amended** and selections are made in accordance with the UGC Regulations, there is a strong possibility that any candidate challenging the selections made in the university/Government college will succeed in a court of law."

**१२.** विद्यापीठ अनुदान आयोगाचा उपरोक्त सर्व पत्रव्यवहार काळजीपूर्वक पाहिला तर पुढील तीन गोष्टी स्पष्टपणे ध्यानात येतात.

१. नेट/सेट ही उमेदवाराने पूर्ण करावयाची पात्रता आहे.

२. माध्यम लक्षात घेवून सेटची पुरशी व्यवस्था तुमच्या राज्यात करा असे विद्यापीठ अनुदान आयोग महाराष्ट्र शासनाला वारंवार सांगत होते.

३. विद्यापीठ अनुदान आयोग महाराष्ट्र शासनाला वारंवार असेही सांगत होते की कायदे, नियम, परिनियम बदलवून तुमच्या राज्यामध्ये प्राध्यापक म्हणून भरती होणाऱ्या उमेदवारीसाठी नेट/सेट ही पात्रता परीक्षा सक्तीची करा?

वरील पैकी एकही गोष्ट शासनाने केली नाही.

**१३. जे करायला पाहिजे होते ते केले नाही आणि समझोत्यामध्ये, कायद्यामध्ये, नियमामध्ये, यु.जी.सी.च्या किंवा केंद्रशासनाच्या मार्गदर्शक तत्त्वामध्ये अंतर्भूत नसलेल्या गोष्टी एकामागून करण्याचा सपाटा आमच्या नोकरशाहीने महाराष्ट्रामध्ये सुरू केला.**

"नेट सेट परीक्षा उत्तीर्ण केली असेल तरच ३१ मार्च १९९४ नंतर त्यांना सेवेत ठेवण्यात यावे" असा पहिला हूकुम २ फेब्रुवारी १९९४ च्या शासन पत्रान्वये काढण्यात आला. "३१ मार्च १९९५ पर्यंत नेट सेट परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा" असा दुसरा आदेश ७ मार्च १९९४ च्या पत्रान्वये देण्यात आला. त्यानंतर "३१ मार्च १९९६ पर्यंत नेट सेट परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा" असा आदेश २० मार्च १९९४ च्या शासन पत्रान्वये देण्यात आला. परिनियमांनी केलेली व्यवस्था पत्राने मोडून काढण्याच्या या प्रकाराने शेकडो शिक्षकांना गेली अनेक वर्षे अत्यंत मानसिक तणावात काढावी लागली. २ फेब्रुवारी १९९४ ते २० मार्च १९९४ या दोन महिन्याच्या (धड दोन सुद्धा नव्हे) काळातील उच्च शिक्षण विभागाची ही तीन पत्रे पाहिली म्हणजे या साऱ्या प्रकाराची एकंदर हास्यास्पदता लक्षात येते. विशेष असे की पत्रापत्रीचा हा सारा प्रकार केंद्र शासनाच्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या, परिनियमांच्या व समझोत्याच्या विरोधात होता.

**१४.** विधानपरिषदेत गुरुवार, दिनांक १७ मार्च १९९४ रोजी झालेल्या चर्चेमध्ये मी स्वतः ही गोष्ट लक्षात आणून दिली की, "हा मुदत वाढवून देण्याचा प्रश्न नाही. ही नवीन व्यवस्था केंव्हा सुरू करणार?" हा खरा प्रश्न आहे. त्याच चर्चेत मी असेही सांगितले की, "आपण १९९६ असे सांगत आहात पण मी म्हणतो की त्यापूर्वी सुरू करा" **एक म्हणजे नेट सेट झालेले पुरेसे उमेदवार उपलब्ध होतील अशी व्यवस्था करणे व दुसरे म्हणजे नेटसेट ही पात्रता उमेदवारावर सक्तीची करणारा कायदा (परिनियम) करणे या दोन गोष्टी शासनाने आजतागायत केलेल्या नाहीत.**

**१५.** दिनांक २५ सप्टेंबर १९९५ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने मंत्रालयावर आयोजित केलेल्या मोर्चाच्या वेळी मा. उच्च शिक्षण मंत्र्यांना दिलेल्या निवेदनामध्ये ३१ मार्च १९९६ पर्यंत नेट सेट परीक्षा उत्तीर्ण करण्याचे परिपत्रक शासनाने मागे घेतले नाही तर संघटनेला आंदोलनाशिवाय पर्याय रहाणार नाही याची स्पष्ट जाणिव दिली होती. विद्यमान मा. उच्च शिक्षणमंत्री व मा. शिक्षण सचिव यांनी ६ नोव्हेंबर १९९५ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला चर्चेसाठी बोलाविलेल्या बैठकीच्यावेळी वरील सर्व मुद्यांचे पुनःकथन संघटनेच्या वतीने मा. मंत्रिमहोदयांसमोर करण्यात आले. या बैठकीचे जे एकतर्फी कार्यवृत्त मा. सचिवांनी नोंदविले आहे, त्याची प्रत संघटनेकडे पाठविण्यात आली असून या कार्यवृत्तात असे नमूद आहे की "**जे अधिव्याख्याता ३१ मार्च १९९६ पर्यंत नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होणार नाहीत त्यांना सेवेतून मुक्त करण्यात यावे. असे शासनाचे सध्याचे आदेश आहेत. तथापि त्यावर पुन्हा शासनाकडून जरूर तो विचार करण्यात येईल.**"

**१६.** शासनाने याबाबत जरुर तो विचार करुन २२ डिसेंबर १९९५ चा शासन निर्णय निर्गमित केला. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने आपल्या ७ जानेवारी १९९६ च्या बैठकीत या शासननिर्णयावर प्रतिक्रिया देणाऱ्या आपल्या ठरावात स्पष्टपणे असे नमुद केले होते की :-

"(अ) नेटसेट बाबत शासनाची भूमिका विद्यापीठ अनुदान आयोगाच्या, तसेच केंद्र शासनाच्या धोरणाशी व महाराष्ट्र शासनाशी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचा जो समझोता झाला त्याच्याशी पूर्णपणे विसंगत होती याचा कबुलीजबाबच या २२ डिसेंबर १९९५ च्या शासन निर्णयाने दिलेला आहे. **"नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण करण्याची दिनांक ३१.३.१९९६ ची मुदत या आदेशाव्दारे काढून टाकण्यात येत आहे."** हा शासन निर्णयाच्या परिच्छेद ७ (अ) मधील उल्लेख म्हणजे एमफक्टोने याबाबत घेतलेली भूमिका किती

बिनचूक होती याचा पुरावाच आहे. तथापि **तदर्थ स्वरूपाच्या नेमणूका देणे, सेवेत असलेल्या अधिव्याख्यात्यांना नेट सेट परीक्षा उत्तीर्ण होण्याची सक्ती करणे, न झाल्यास वार्षिक वेतनवाढ देण्यात न येणे, त्यांची सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विचारात न घेणे, सेवा ज्येष्ठता न देणे या शासन निर्णयातील अटी संपूर्णपणे समझोत्याच्या व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या व केंद्र शासनांच्या सुचनांच्या विरुद्ध आहेत.** त्यामुळे या अटी ताबडतोब मागे घेण्यात याव्या अशी मागणी ही सभा करीत आहे.

**(ब)** केंद्र शासनाच्या २२ जुलै ८८ च्या सूचनांमध्ये व महाराष्ट्र शासनाच्या २७ फेब्रुवारी १९८९ च्या शासन निर्णयामध्ये 'शिक्षक' व 'उमेदवार' असा स्पष्ट फरक करण्यात आलेला आहे. रिफ्रेशर कोर्सेस शिक्षकांसाठी असून राष्ट्रीय पात्रता परीक्षा ही उमेदवारांसाठी आहे. उमेदवारांसाठी असलेल्या अटी शिक्षकांवर लादणे सर्वस्वी गैर आहे." या महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या भूमिकेचा पुनरूच्चार करण्यात येत आहे.

**(क)** "नेट सेट परीक्षा ३१ मार्च १९९४ पर्यंत उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा" असा आदेश **पहिल्या सोमवारी** काढावयाचा, "३१ मार्च १९९५ पर्यंत नेट सेट परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा" असा आदेश **दुसऱ्या सोमवारी** काढावयाचा व "३१ मार्च १९९६ पर्यंत नेट सेट परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा" असा आदेश **तिसऱ्या सोमवारी** काढावयाचा **या स्वतःवर लादून घेतलेल्या विक्षिप्त प्रकारातून उच्च शिक्षण विभागाची आता मुक्तता झालेली आहे ही आनंदाची गोष्ट आहे.**

**(ड)** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या व केंद्र शासनाच्या सूचनांच्या आधारावर झालेल्या **समझोत्याचा भंग करणाऱ्या कोणत्याही अटी स्वीकारण्यास हे कार्यकारी मंडळ ठाम नकार देत आहे.**

**(इ)** कोठारी कमिशनचा अहवाल, डॉ. राधाकृष्णन कमिशनचा अहवाल, सेन समितीचा अहवाल, मेहरोत्रा समितीचा अहवाल, यातून राष्ट्रीय पातळीवर स्थिर झालेल्या विचारमंथनाशी या अटी पूर्णपणे विसंगत असून **उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे हे संपूर्णपणे "लोकल प्रॉडक्शन" आहे ही गोष्ट जाहीर पणे नमूद करणे आवश्यक वाटते.** केंद्र शासनाच्या व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचना यांच्याशी या अटी पूर्णपणे विसंगत आहेत.

**(फ)** तदर्थ स्वरूपाच्या नेमणुका देण्याला राजमान्यता प्रदान करून उच्च व तंत्रशिक्षण विभागाने इतिहासाचे काटे उलटे फिरविलेले आहेत. **अगोदरच शिक्षण क्षेत्रामध्ये फार मोठ्या प्रमाणावर चाललेल्या दुकानदारीला व भ्रष्टाचाराला "युरिया, सुफला व सुपर फॉस्पेट" या दर्जाचे "तदर्थ नेमणुकांचे" रासायनिक खत पुरविण्याच्या या निंद्य प्रकाराची जेवढी करावी तेवढी निर्भत्सना थोडीच आहे."**

**१७. ७ जानेवारी १९९६ च्या बैठकीत मंजूर केलेला हा ठराव महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या सचिवांनी दिनांक ८ जानेवारी १९९६ रोजी सचिव उच्च शिक्षण यांना सादर केला त्याची पोचपावती महासंघाच्या कार्यालयात उपलब्ध आहे.** अशा या पार्श्वभूमीवर गुरूवार, दिनांक २६ मार्च १९९८ रोजी "नेट किंवा सेट या परीक्षा उत्तीर्ण न होणाऱ्या महाविद्यालयीन अध्यापकांची सेवा अस्थायी ठरविण्याबाबत शासनाने दिलेले आदेश." या विषयावरील लक्षवेधी सूचना सभागृहात चर्चेसाठी आली. या चर्चेत मी स्वतः याबाबत आवश्यक ती माहिती देवून पुढील प्रमाणे प्रश्न विचारला "अध्यक्ष महाराज, या ठिकाणी चर्चा झाली. १७ मार्च १९९४ ला मा. मुख्यमंत्री स्वतः येथे आले आणि त्यांनी स्वतः येथे येवून सांगितले की, **"यापूर्वी शिक्षक झाले त्यांना याची आवश्यकता नाही असे मा. सदस्य श्री.बी.टी.देशमुख सांगत आहे ती जर वस्तुस्थिती असेल तर यासंबंधीचा अपवाद करण्याची तयारी राहील. फक्त त्यासंबंधी माझी एवढीच सूचना आहे की, मा. शिक्षण मंत्री, त्या खात्याचे सचिव आणि आपले प्रतिनिधी यांच्याबरोबर समक्ष बसून याची शहानिशा करतो."** अध्यक्ष महाराज, त्यावेळेला घोषित केल्याप्रमाणे मा. मुख्यमंत्र्यांनी बैठक घेतली त्याच आठवड्यात, आणि स्पष्ट सांगितले की, "यु.जी.सी. मध्ये हे कोठे आहे ते दाखवा नाही तर काढून टाका." परंतु ब्युरॉक्रसी ने १७-१८ महिने काही केले नाही. त्यानंतर मा. विद्यमान मंत्रिमहोदय आल्यानंतर एमफक्टोची बैठक त्यांनी बोलाविली, चर्चा केली आणि त्यांनी त्यानंतर २२ डिसेंबर १९९५ चे आदेश काढले आणि "३१ मार्च ९६ पर्यंत नेट सेट न केल्यास काढून टाका ही अट काढून टाकली." परंतु आता काय अटी टाकल्या आहेत? अध्यक्ष महाराज, या अटींना ना कराराचा आधार आहे, ना समझोत्याचा आधार आहे, ना युजीसीच्या पत्राचा आधार आहे, ना गव्हर्नमेंट ऑफ इंडियाच्या पत्रात त्याला आधार आहे. या अटी अतिशय दुर्दैवी अशा आहे. **संबंध भारतात कोठे नाही असा हा मसाला आहे. याठिकाणी महाराष्ट्राच्या ब्युरॉक्रॉसीचे हे टोटली लोकल प्रॉडक्शन आहे. काय नमुनेदार अटी आहेत पहा, तदर्थ नेमणुका द्या त्यांना, पुढील वेतनवाढ त्यांना देवू नका, त्यांना सेवा ज्येष्ठता देवू नका, त्यांच्या सेवा वरिष्ठ व निवडश्रेणी साठी धरू नका, अशा या अटी आहेत,** माझे असे म्हणणे आहे की, करारामध्ये या अटी कोठेही नाहीत, तुम्ही कराराची दोन पत्रे वाचली. ठरले असे आहे की, पॅकेज म्हणून मान्य करा. परंतु त्या पॅकेजमध्ये तुम्ही म्हणता हे कोठेही नाही, उलट आहे. तुम्ही जे वाचले ते माझ्याजवळ आहे. त्यामध्ये असे आहे की, दोन वर्षाचे वर प्रोबेशन चालणार नाही, कन्फर्मेशन दिले पाहिजे. तुम्ही सांगितले, तदर्थ नेमणुका द्या म्हणून. इन्क्रीमेंट देवू नका. मला कळत नाही हा मसाला तुम्ही आणला कोठून? ज्या चार गोष्टी मी आता सांगितल्या तुमच्या शासन निर्णयातील, **त्या करारामध्ये नाही. विद्यापीठ अनुदान मंडळाच्या सूचनांमध्ये नाही. तसेच केंद्र सरकारच्या शासन निर्णयात नाही. त्यामुळे या अटी ताबडतोब मागे घेण्यात याव्या. नाही तर त्याचा आधार काय आहे ते सांगावे. कारण हे तुमच्या नोकरशाहीचे लोकल प्रॉडक्शन आहे. तुम्ही घुसाडलेल्या या अटींचे आधार काय ते सांगा?"**

**१८.** मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी त्यावर पुढीलप्रमाणे उत्तर दिले "शिक्षकांच्या पात्रतेसंबंधीची गुणवत्ता टिकावी आणि त्यामुळेच ८० टक्के अनुदान आपल्याला केंद्राकडून मिळते. त्यासंबंधीच्या अटी आमच्याकडून पूर्ण झाल्या नाहीत तर मला असे वाटते की, पाचव्या वेतन आयोगाला सुद्धा यु.जी.सी. विचारेल की, तुम्ही सगळ्या अटी प्रमाणे काम करत नसाल तर त्या अनुदानात सुद्धा फरक पडेल. आणि म्हणून या दृष्टीने या गोष्टी केल्या आहेत."

**१९.** मी पुन्हा जेव्हा "माझे म्हणणे हे आहे की आपण म्हणता ते बरोबर आहे. ८० टक्के असिस्टन्स दिला हे ज्या पत्रांनी दिले त्यामध्ये नेमणुका तदर्थ हे कुठेच नाही. इन्क्रीमेंट देऊ नका हे कुठेच नाही सेवा धरू नका हे कुठेच नाही, नेट सेट रिक्रुटमेंट लेव्हलला कायदा करून कंपलसरी कॉलिफीकेशन म्हणून तुम्ही प्रिस्क्राइब करा. त्यासाठी स्टॅट्युट करा, असे म्हटले आहे. ते करा तुम्ही. त्याला आमची मनाई नाही. मी मागेही म्हणालो की, मुदत वाढवू नका, उद्या करा ना? "Amendment of relevant University statute for prescribing this as minimum qualification" असे युजीसीने म्हटले ते तुम्ही करा. तुम्ही कायदा अजूनही केला नाही. कायद्याने जे प्रिस्क्राईब करावयाचे आहे ते न लावता बेकायदेशीरपणे लावणे बरोबर नाही. आणि म्हणून माझे पुन्हा म्हणणे आहे की चार गोष्टी युजीसीच्या कोणत्या पत्रामध्ये आहेत? या लोकांना वर्षानुवर्षे टेम्पररी नेमा. इन्क्रीमेंट देऊ नका हे कुठे आहे युजीसीमध्ये ते सांगा?" असा प्रश्न विचारला तेव्हा त्यानंतर पुढील प्रमाणे प्रश्नोत्तरे झाली :-

**श्री. दत्ता राणे :** यासंबंधी शासनावर ज्या जबाबदाऱ्या सोपविल्या आहेत त्याची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने या अटी घातल्या आहेत.

**उपसभापती :** सदस्यांनी ज्या तीन अटी सांगितल्या त्या युजीसी च्या कोणत्या पॉलिसीमध्ये आहेत ते सांगा?

**श्री.दत्ता राणे :** केंद्र सरकारकडून ८० टक्के अनुदान मिळते. त्यामुळे शासनावर या जबाबदाऱ्या आहेत. या जबाबदाऱ्यामुळे अशा तऱ्हेच्या पात्रता प्रत्यक्षात याव्यात आणि त्या येण्याकरिता शासनाने या अटी घातल्या आहेत. नाही तर त्या परीक्षा होणारही नाहीत.

**श्री.पी.जी.दस्तुरकर :** सभापती महोदय, ३ डिसेंबरला हजारो प्राध्यापकांनी सम्राट हॉटेलपुढे धरणे धरले. नऊ जानेवारीला मास कॅज्युवल लिव्ह घेतली. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी सगळे वाचून दाखविले. माननीय मंत्री महोदयांनी उल्लेख केला म्हणून रिपीट करतो. २७ फेब्रुवारी, १९८९ चा शासन निर्णय आहे त्यामध्ये असे म्हटले आहे की, तोवर ही जुनीच प्रक्रिया चालू राहिल तर सभापती महोदय, इंग्रजीमध्ये मी पुन्हा रिपीट करतो. you do your duty first and then make it compulsory. हे सुटेबल रिप्लेसमेंट त्या ठिकाणी झाले नसेल तर, ह्या ज्या अटी लावल्या आहेत त्या लावण्याचे काय कारण आहे? त्या अटी रद्द करणार आहात काय?

**श्री.दत्ता राणे :** मी मघाशीच सांगितले की, शासनाने यासंबंधीची शिक्षकांची पात्रता असावी यासंबंधीच्या ८० टक्के अनुदानाच्या संबंधीच्या शासनावर ज्या जबाबदाऱ्या आहेत त्यामधून ह्या गोष्टी आलेल्या आहेत आणि त्या शासनाने ठरविल्या आहेत.

**श्री. पी.जी.दस्तुरकर :** माझ्या प्रश्नाचे उत्तर आले नाही. सुटेबली रिप्लेसमेंट केले काय हे मी विचारले पण त्यांनी त्याबद्दल काहीही सांगितले नाही."

**२०.** यावर पुन्हा मी "सभापती महोदय, आम्हाला सवलत वगैरे नको. हा हक्काचा व कायद्याचा प्रश्न आहे. या ठिकाणी चार अटी कोठे आहेत. माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी ज्या चार अटी लादलेल्या आहेत त्या कोठे आहेत? मध्यवर्ती सरकारने २२ जुलै १९८८ च्या पत्रान्वये २९ अटी घातल्या आहेत. त्या आम्हाला मान्य आहेत. त्यामध्ये या अटी कोठे आहेत? २४ महिन्यापेक्षा जास्त काम केल्यानंतर त्यांना कन्फर्म करण्यात यावे असे

आहे त्यामध्ये, तर यांनी तदर्थ नेमा असा जी.आर. काढला आहे. ही अट त्यामध्ये कोठे आहे? या ठिकाणी केंद्र सरकारने ८० टक्के असिस्टंन्स दिले आहे ते शासन आपल्याला सांगत आहे की नेटसेटची व्यवस्था करा. कायदे बदला. That is the suitable replacement of old system by new system.

या ठिकाणी आज आपण ते केलेले नाही. या ठिकाणी स्टॅट्युट न करता सारे चालू आहे. दोन वर्षाने कन्फर्म करा असा परिनियम आहे. त्याबाबतीत आज स्टॅट्युट आहेत म्हणून या शासनाने घातलेल्या अटी या ठिकाणी केंद्र शासनाने वा युजीसी ने ज्या अटी घातल्या त्या अटी मध्ये हे नाही. या सरकारने ह्या कोठून काढल्या आहेत ब्युरॉक्रसीनेच हे सगळे काही केले आहे.

## ‘नुटा बुलेटीन’चे कायम वर्गणीदार

‘नुटा बुलेटीन’ हे नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाचे अधिकृत मुखपत्र आहे. १९७६ पासून आजपावेतो सातत्याने व नियमितपणे ते प्रकाशित करण्यात येत आहे. गेल्या २५ वर्षात कोणत्या वर्षात किती मुद्रित पृष्ठे प्रकाशित करण्यात आलीत याचा तपशील खाली दिलेला आहे.

| अ.न. | वर्ष | पृष्ठे | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | १ | २ | ३ |
| १ | १९७६ | ८३ | १३ | १९८८ | ९१ |
| २ | १९७७ | ११७ | १४ | १९८९ | ५८ |
| ३ | १९७८ | १४९ | १५ | १९९० | ४२ |
| ४ | १९७९ | १३९ | १६ | १९९१ | ४० |
| ५ | १९८० | ५४ | १७ | १९९२ | ८४ |
| ६ | १९८१ | ४४ | १८ | १९९३ | ५२ |
| ७ | १९८२ | ३४ | १९ | १९९४ | ७२ |
| ८ | १९८३ | ५६ | २० | १९९५ | ६४ |
| ९ | १९८४ | २२ | २१ | १९९६ | १४८ |
| १० | १९८५ | ३८ | २२ | १९९७ | २१२ |
| ११ | १९८६ | ६४ | २३ | १९९८ | १३६ |
| १२ | १९८७ | ६६ | २४ | १९९९ | १७२ |
| | | | २५ | २००० | १०८ |

१ जानेवारी ते ३१ डिसेंबर या कालावधीतील पृष्ठांना एकामागून एकचे पृष्ठ क्रमांक देण्यात येतात. वर्षाच्या शेवटी वर्षभरातील मजकुराची अनुक्रमणिका दिल्या जाते. त्यामुळे बिनचुक व समप्रकारची संकलन सुलभता, तसेच संदर्भ सुलभता यांचा लाभ होतो.

मुख्यत्वे हे बुलेटीन नुटाच्या आजीव सदस्यांना नियमितपणे पाठविले जाते. अनेक व्यक्ती व संस्थांच्या आग्रहावरून गेल्या काही वर्षांपासून सदस्य नसलेल्या व्यक्ती व संस्थांना कायम वर्गणीदार म्हणून नोंदवून बुलेटीन पाठविण्याची व्यवस्था सुरू करण्यात आलेली आहे. नुटा या संघटनेच्या कार्यालयामध्ये सर्व कामे संघटनेचे पदाधिकारीच पार पाडत असल्याने वार्षिक वर्गणी स्वीकारण्याची व्यवस्था ठेवण्यात आलेली नाही.

नुटाचे आजीवन सदस्यत्व शुल्क रुपये ४००१ आहे. कायम वर्गणीदारासाठी ‘नुटा बुलेटीन’ची वर्गणी सुद्धा रुपये ४००१ एवढीच ठेवण्यात आलेली आहे. रेखांकित धनाकर्ष किंवा धनादेशाद्वारे रुपये ४००१ "Treasurer NUTA" या नावाने काढून तो “**प्रा. एस.ए.तिवारी, कोषाध्यक्ष नुटा, ४२ शंकर नगर, अमरावती ४४४ ६०६**” या पत्त्यावर पाठविल्यास पुढील महिन्यापासून नियमित अंक पाठविण्यात येतो. अनेकांनी चौकशी केल्यावरुन उपरोक्त माहिती बुलेटीनमध्ये प्रकाशित करण्यात येत आहे.

**- प्रा. एस.ए.तिवारी,**
**कोषाध्यक्ष नुटा, ४२ शंकर नगर,**
**अमरावती ४४४ ६०६**

*__नोट__ : सन २००१ मध्ये कायम वर्गणीदार होणाऱ्या वर्गणीदारांना उपलब्धतेनुसार व उपलब्ध असेतोवर जुन्या अंकांचे वर्षनिहाय संच पुरविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. - __कोषाध्यक्ष, नुटा__*

मी यापूर्वी म्हणालो ते पुन्हा म्हणू इच्छितो. It is a totally local production produced by mantralaya in Maharashtra. हे सरकार मात्र या चार अटी या ठिकाणी टाकू इच्छित आहे. २४ महिने नोकरी केल्यानंतर कन्फर्म करण्यात येते. या ठिकाणी थेट रिक्रुटमेंटला तुम्ही तुमचे कायदे करा. या ठिकाणी केंद्र सरकारने ८० टक्के असिस्टंन्स दिला आहे. म्हणून या ठिकाणी या सरकारने या ज्या चार अटी घातलेल्या आहेत, त्या ताबडतोबीने मागे घेण्याची गरज आहे. कारण या ठिकाणी केंद्र सरकारच्या अटीचा भंग होत आहे. सभापती महोदय, यातील एकही अट केंद्र शासनाने किंवा युजीसीने घातलेली नाही.” अशी माहिती दिली, त्यानंतर पुढील प्रमाणे प्रश्नोत्तरे झाली :-

**श्री. दत्ता राणे :** सभापती महोदय, याबाबतीत मी सुरुवातीलाच सांगितलेले आहे ८० टक्के अनुदानासंबंधीचा प्रश्न आहे. नेट सेट परिक्षेसंबंधात या शासनाने अटी घातलेल्या आहेत त्याच्या मागे असा हेतू आहे की, विद्यापीठाने याबाबत परिनियम करावेत. कायद्यामध्ये बदल करावा. म्हणून या बाबतच्या सर्व बाबी उत्तरात आलेल्या आहेत.

**श्री.बी.टी.देशमुख :** त्याचा आधार काय आहे?

**उपसभापती :** ८० टक्के अनुदान मिळणार आहे, त्याच्या पोटी आलेल्या या अटी आहेत काय?

**श्री.दत्ता राणे :** त्याचा आधार असा आहे की, ८० टक्के जे अनुदान मिळते त्याच्या आधारावर.....

**(गोंधळ)**

**उपसभापती :** त्या अटी युजीसी च्या आहेत काय?

**श्री.दत्ता राणे :** त्यासंबंधी युजीसीच्या अटी नसल्या तरी महाराष्ट्र सरकारने....

**(गोंधळ)**

सभापती महोदय, मी सुरुवातीलाच वाचून दाखविले आहे जो करार झाला त्या करारामध्ये म्हटले आहे कंपोझीट स्कीममध्ये या सर्व गोष्टी.....

**(गोंधळ)**

**२१.** यावर सन्माननीय सदस्य श्री. अरुण मेहता यांनी पुढील प्रमाणे हरकतीचा मुद्दा उपस्थित केला :-

“सभापती महोदय माझा हरकतीचा मुद्दा आहे. मा. सदस्य डॉ अशोक मोडक, मा. सदस्य श्री.बी.टी.देशमुख आणि इतर सहकारी सातत्याने हा मुद्दा मांडीत आहेत की जे ८० टक्के असिस्टन्स मिळते त्याच्याकरिता केंद्र सरकारने किंवा युजीसी ने अटी घातलेल्या नाहीत त्या अटी महाराष्ट्र सरकार कशा घालू शकते? ज्या अटी घातल्या आहेत त्यांना अनुलक्षून अटी घातल्यावर त्याला कुणाचाही विरोध नाही. आपणही त्या विषयी विचारले आहे. तेव्हा पहिल्यांदा ज्या कोणत्या ८० टक्के असिस्टन्सच्या संदर्भात अटी असतील तर त्या समोर येवू द्या. याला कारण असे की एका बाजूला सातत्याने सांगितले जाते की या अटी नाहीत आणि परिच्छेदच्या परिच्छेद उधृत करतांना माणसे दिसतात. दुसऱ्या बाजूने आपण म्हणता की त्यामध्ये ८० टक्के असिस्टन्सच्या संदर्भात अटी आहेत. त्या वाचून दाखविणे क्रमप्राप्त आहे. म्हणून माझा हरकतीचा मुद्दा असा की, या अटी सभागृहासमोर आल्या की, सेट नेटच्या संदर्भात सर्व सेटराईट होईल.”

त्यावर मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी पुढीलप्रमाणे उत्तर दिले. “**त्या अटी आता माझ्याजवळ नाहीत त्या मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.**” मा. मंत्रिमहोदय यांच्या या उत्तरामुळे “**तर मग लक्षवेधी सूचना राखून ठेवा**” अशी मागणी आली. त्यावर सभापतीस्थानी असलेले मा. उपसभापती श्री.ना.स.फरांदे असे म्हणाले की “माननीय सदस्य नेमका प्रश्न असा विचारीत आहेत की युजीसी कडून, केंद्र सरकारकडून वाढीव पगारासाठी ८० टक्के अनुदान येते त्याबाबतीत कोणत्याही अशा प्रकारच्या अटी नाहीत असे ते अतिशय खात्रीपूर्वक ठामपणे सांगत आहेत. अशाप्रकारच्या कोणत्याही अटी युजीसी च्या परिपत्रकामध्ये नाहीत आणि आपण सांगत आहात त्या अटी आहेत परंतु त्या माझ्याजवळ आता नाहीत.”

२२. मा. उपसभापतींच्या उपरोक्त उद्‌गारानंतर पुढीलप्रमाणे प्रश्नोत्तरे सभागृहात झाली :-

“**श्री.दत्ता राणे :** सभापती महोदय, याबाबत शासनाला युजीसी बरोबर कन्सल्ट करावे लागेल. त्यानंतर यासंबंधी निर्णय घेतो.

**श्री. अरुण मेहता :** नाही.

**(गोंधळ)**

**प्रा.बी.टी.देशमुख :** युजीसी ने स्पष्ट सूचना दिल्या आहेत. त्यांच्या बरोबर कन्सल्ट करण्याचा प्रश्न नाही. त्यांनी जे सांगितले नाही ते तुम्ही केले आता त्यांना कशासाठी कन्सल्ट करता? विथड्रा युवर लोकल प्रॉडक्शन

फर्स्ट. माझ्याजवळ त्या अटी आहेत. आमचे हे दुर्दैव की त्या तुमच्या जवळ नाहीत. तर मग ही लक्षवेधी सुचना राखून ठेवा.

**उपसभापती :** युजीसी च्या **स्कीममध्ये नाही ते त्यांनी मान्य केले.**

**श्री. पी.जी.दस्तुरकर :** म्हणूनच ही लक्षवेधी राखून ठेवा.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, केंद्र शासनाच्या व युजीसी च्या त्या अटींमध्ये या गोष्टी नाहीत म्हणून माझे असे म्हणणे आहे की ही लक्षवेधी सूचना राखून ठेवा.

**(गोंधळ)**

**श्री. अरुण मेहता :** सभापती महोदय, माझ्या हरकतीच्या मुद्यावर उत्तर आले नाही. आपण सांगितले व माननीय सदस्यांनीही म्हटले की आपण अटी वाचून दाखवा. परंतु त्यांच्याजवळ नाहीत माझा हरकतीचा मुद्दा अपहेल्ड झाला. म्हणून त्या आधारावर आपण लक्षवेधी सूचना राखून ठेवली पाहिजे.

**श्री.सुरेश पाटील :** सभापती महोदय, ज्या तीन अटी सांगितल्या आहेत त्या अटींचा आधार घेवून मंत्रिमहोदय वारंवार सांगत आहेत त्या काय आहेत त्या सांगाव्यात अन्यथा ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी.

**उपसभापती : त्या अटी त्यांच्याजवळ नाहीत म्हणून ते सांगू शकत नाहीत.**

**श्री. अरुण मेहता :** तर मग ही लक्षवेधी सूचना राखून ठेवा.

**(गोंधळ)**

**श्री. अरूण मेहता :** सभापती महोदय when the minister concerned has incomplete information about the issue तेव्हा लक्षवेधी सुचना राखुन ठेवली पाहीजे दुसरा काय पर्याय आहे.

**उपसभापती :** याला दुसरा काहीच पर्याय नाही.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय माननीय मंत्रीमहोदयांचे सारे आर्ग्युमेंट ८० परसेंटच्या संबंधात आहे. पण त्याच्या संबंधातील ज्या अटी आहेत त्याची त्यांच्या कडे काहीच माहिती नाही."

२३. या लक्षवेधी चर्चेवरील सुचनेच्या शेवटी "सभापती महोदय, ही माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो." असे उद्‌गार मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी काढले व त्यावर मा. उपसभापती श्री.ना.स.फ़रांदे यांनी पुढीलप्रमाणे निर्णय दिला :-

**"या सबंध लक्षेवधी सुचनेचा नेमका तोच प्राण आहे. लक्षवेधी सूचनेच्या विषयामध्ये जे आहे तीच माहीती सभागृहासमोर येत नसल्यामुळे ही लक्षवेधी सूचना मी राखून ठेवतो."**

२४. गुरुवार, दिनांक २६ मार्च १९९८ रोजी राखुन ठेवलेली ही लक्षवेधी सूचना शुक्रवार, दिनांक ३ एप्रिल १९९८ च्या कामकाजाच्या क्रमामध्ये पहिल्याच क्रमांकावर दाखविण्यात आली होती. कामकाजाच्या क्रमात लक्षवेधी सुचना येताच मा. मंत्रिमहोदयांनी एक लांबलचक मुद्रित निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले व मा. सभापतींना अशी विनंती केली की, ''**अध्यक्ष महोदय, मी आपल्याला या संबंधीचे पत्र दिलेले आहे. लक्षवेधी सूचनेवर अधिक साकल्याने चर्चा आणि विचार करण्याची गरज शासनाला वाटत आहे. म्हणून आपण या सूचनेसाठी १० दिवसाची मुदत द्यावी अशी माझी आपल्याला विनंती आहे.**"

व त्यानंतर ही लक्षवेधी सूचना पुन्हा पुढे ढकलल्या गेली.

२५. मा. मंत्रिमहोदयांनी ३ एप्रिल रोजी जे लेखी निवेदन सभागृहात दिले त्यामध्ये असे स्पष्टपणे कबूल करण्यात आले आहे की "**विद्यापीठ अनुदान आयोगाने तदर्थ नियुक्त्या करणे, नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत वेतनवाढी रोखून ठेवणे, अपात्र अधिव्याख्यात्यांना जोपर्यंत ते पात्र ठरत नाहीत तोपर्यंतची त्यांनी सेवा वरिष्ठ श्रेणी वा निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरणे याबाबत वेगळे आदेश दिले नाहीत.**"

याच निवेदनामधील पुढील विनोदी मजकुर सुद्धा लक्षात घेण्यासारखा आहे. :-

"अपात्र **उमेदवारांच्या** (नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण न झालेले **उमेदवार**) नियुक्त्याच करू नयेत असे विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी विद्यापीठांना व राज्य शासनास कळविले आहे. वास्तविकतः अशा अपात्र **उमेदवारांना** सेवेत ठेवणे हेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमाच्या विरुद्ध आहे." ही गोष्ट कायद्याने बंधनकारक करण्यास, असा अपात्र उमेदवार फाटकाच्या आतच शिरणार नाही, अशा उमेदवाराला शिक्षक होताच येणार नाही, असा कायदेशीर बंदोबस्त करण्यास, शासनाला जणू काही कोणी मनाई केली आहे. असा यातुन जो भास होतो तो यातील खरा विनोद आहे. **नेटसेट ही एक** अशी बाब आहे की ज्याबाबत शासन हे शासन म्हणून काम करण्यास गेली १० वर्षे सतत नकार देत आहे. "मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी तयार केलेल्या अटींच्या स्थानिक उत्पादनावर आधारित प्रेमाचा मामला" असे या व्यवहाराचे **स्वरूप आणखी किती दिवस तसेच चालु रहाणार आहे?**

**२६. जी व्यवस्था विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमांच्या विरूद्ध आहे ती जुनी व्यवस्था रद्दबादल ठरवून नविन व्यवस्था त्याठिकाणी आणणारे परिनियम शासन केंव्हा करील?** हाच खरा यातील प्रश्न आहे. पण असे नियम करायचे तर त्यासाठी लागणारी पूर्व तयारी करण्याची शासनाजवळ अजिबात इच्छाशक्ती नाही. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ प्रमाणे शिक्षकांच्या सेवाशर्ती या परिनियमांनी ठरतात. परिनियम तयार करण्याचा अधिकार या कायद्याच्या कलम ५१ (८) प्रमाणे विद्यापीठांचा आहे तर याच **कायद्याच्या कलम ८ (३) प्रमाणे शासनाला सुद्धा परिनियम करण्याचा अधिकार आहे.** नेटसेट परीक्षा घेण्याचे अधिकार युजीसीने किंवा शासनाने विद्यापीठांना दिले नाहीत त्यामुळे विद्यापीठांनी परिनियम तयार करण्याचा प्रश्नच उदभवला नाही. **शासनाने परिनियम का केले नाही? याचे उत्तर ही बाब हाताळणाऱ्या शासकीय नोकरशाहीचा गलथानपणा हेच आहे.**

२७. नोकरशाहीच्या या गलथानपणाची शिक्षा सेवेत असलेल्या शिक्षकांना देता येणार नाही. राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांनी "**यापूर्वी शिक्षक झालेले आहेत आणि त्यांना याची आवश्यकता नाही असे सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख सांगत आहेत. तर ती वस्तुस्थिती असेल तर त्यासंबंधीचा अपवाद करण्याची तयारी राहील.**" असे स्पष्ट आश्वासन गुरुवार, दिनांक १७ मार्च १९९४ रोजी सभागृहामध्ये दिल्यानंतर सुद्धा "**नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण करण्याची दिनांक ३१.३.१९९६ ची मुदत या आदेशाव्दारे काढून टाकण्यात येत आहे.**" अशी तरतूद असलेला शासन निर्णय निर्गमित करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाला २१ महिन्याचा कालावधी लागावा **ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे व तसे करतांना २२ डिसेंबर ९५ च्या या शासन निर्णयात अनेक अवांच्छनिय अटी टाकल्या जाव्या ही महादुर्दैवी बाब आहे.**

२८. १३ मे १९९३ रोजी दिल्ली उच्च न्यायालयाच्या खंडपिठाने एका प्रकरणात (सी.डब्ल्यु.पी.नं. ३५७० ऑफ १९९२ अँड सी.एम. नं. ६६७५ ऑफ १९९२) या अटीबाबत "This will however, not apply to the appointments already made" अशा प्रकारचा स्पष्ट निवाडा दिलेला असतांना सुद्धा ही बाब आमच्या नोकरशाहीने उच्च शिक्षणमंत्र्यांपासून दडवून ठेवली आहे, असे स्पष्टपणे दिसून येते. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सचिवांनी महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण सचिवांना १५ जुन १९९३ रोजी एक पत्र लिहून "नेटसेटची पुरेशी व्यवस्था करा व परिनियमात बदल करुन ही अट सक्तीची करा" असे कळविले. त्याच पत्रामध्ये "ही अट उमेदवारांसाठी आहे" हेही स्पष्टपणे कळविले आहे. याच पत्रासोबत दिल्ली उच्च न्यायालयाच्या उपरोक्त निवाड्याची प्रतसुद्धा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सचिवांनी महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण सचिवांना पाठविली आहे. मा. उच्च न्यायालयाच्या या निवाड्यामध्ये या अटीबाबत "This will however, not apply to the appointments already made" अशा प्रकारचा स्पष्ट उल्लेख आहे.

**एखादी गोष्ट सक्तीची करावयाची असेल तर प्रथम त्यासाठी कायदा करावा लागतो. प्रथम सक्ती व नंतर कायदा, हे कायद्याच्या राज्याचे लक्षण नव्हे.** पण एवढे कळण्यासाठी सुद्धा कोणीतरी मंत्रालयात हायकोर्टाचा हा निर्णय वाचला पाहिजे ना? खरे म्हणजे कायद्याचे एवढे प्राथमिक ज्ञान होण्यासाठी हायकोर्टाचा निर्णय वाचण्याची सुद्धा गरज कां पडावी? नेटसेट बाबतच्या सर्व कागदपत्रांचे काळजीपूर्वक अवलोकन केल्यास महाराष्ट्रातील नोकरशाहीने गेल्या १० वर्षात जे करायला पाहिजे होते ते केले नाही व करायला नको होते ते करण्याचा असा जोरदार सपाटा लावला की त्यातुन "वार्षिक वेतनवाढ देवू नका, तदर्थ नेमणूका द्या, सेवा धरु नका" यासारख्या कौतुकास्पद अटी फक्त महाराष्ट्रातच सुरू असलेले "मंत्रालयीन लोकल प्रॉडक्शन" या स्वरूपात पैदा झाल्या. त्याला अखिल भारतीय स्तरावर कोणताही आधार नाही किंवा वेगळ्या भाषेत सांगावयाचे झाल्यास त्या स्तरावर महाराष्ट्रासाठी हा एक शरमिंदेपणाचा विषय झाला आहे. मुख्यमंत्र्यांच्या स्तरावर लेखी ठरलेल्या (व समझोत्याचा भाग असलेल्या) गोष्टी एकतर्फी परस्पर 'डेस्क ऑफीसर'च्या स्तरावर बदलविण्याचा दिवसाढवळ्या व राजरोसपणे सुरू असलेला हा प्रकार केवळ शरमिंदे होण्याच्या स्वरूपाचा राहिला नसुन त्याला ओंगळ अशा लाजिरवाणेपणाचे स्वरूप आले आहे. शासकीय अधिकाऱ्यांनी करून ठेवलेल्या गलथानपणाची शिक्षा महाराष्ट्रातील हजारो शिक्षकांनी भोगावी ही या नोकरशाहीची इच्छा पूर्ण करण्यास महाराष्ट्र प्राध्यापक संघाने संपूर्णपणे नकार दिला आहे.

१५.४.१९९८ **बी.टी.देशमुख**, विधानपरिषद सदस्य

******

# "CANDIDATES HAVING HAD THE THEN REQUISITE MINIMUM QUALIFICATION AS WERE EXISTING AT THAT TIME"

## *या वाक्याचा अर्थ सार्वजनिकरित्या समजावून सांगण्याची वेळ आलेली आहे.*

**प्रा.बी.टी.देशमुख,** *विधानपरिषद सदस्य*

१. नेटसेटबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने आपली भूमिका ४ एप्रिल २००० च्या रेग्युलेशनव्दारे स्पष्ट केलेली आहे. "कोणत्याही व्यक्तीला (No person) नेटसेटची पात्रता परीक्षा उत्तीर्ण केल्याशिवाय विद्यापीठातून व महाविद्यालयातून शिक्षकीय पदावर नेमता येणार नाही" असे स्पष्टपणे नमूद करित असतांनाच विद्यापीठ अनुदान आयोगाने आपल्या या नियमाला एक परंतुक जोडलेले आहे. यापूर्वीच नेमल्या गेलेल्या व्यक्तींच्या बाबतीत या परंतुकामध्ये असे ठामपणे नमूद करण्यात आलेले आहे की :-

" Provided further that these regulations shall not be applicable to such cases where selections of the **candidates having had the then requisite minimum qualification as were existing at that time** through duly constituted Selection Committees for making appointments to the teaching posts have been made prior to the enforcement of these regulations."

२. यथोचितरित्या अस्तित्वात आलेल्या निवडसमितीच्या मार्फत ज्यांची निवड झालेली आहे व **त्यावेळी अस्तित्वात असलेली किमान पात्रता जे धारण करतात त्यांना नेटसेटच्या पात्रतेचा नियम लागू असणार नाही,** अशी विद्यापीठ अनुदान आयोगाची स्पष्ट भूमिका आहे. १९९९ पर्यंत महाराष्ट्रामध्ये अधिव्याख्यात्याच्या भरतीसाठी किमान पात्रता काय होती? याबाबत उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी कारण नसतांना बखेडा निर्माण केलेला आहे. याबाबतच्या वादाची सार्वजनिकरित्या चर्चा करणे अपरिहार्य झाले असून विद्यापीठामध्ये किंवा महाविद्यालयामध्ये भरती होण्यासाठी शिक्षकीय पदाची पात्रता कशी ठरविली जाते व ती कोण ठरवितात? हे प्रथम समजावून घेण्याची आवश्यकता आहे.

३. महाराष्ट्र विद्यापीठ कायद्याच्या खंड ५१ मध्ये परिनियमांनी विहित करावयाच्या विषयांची तपशीलवार यादी देण्यात आलेली आहे. खंड ५१ च्या परिच्छेद ८ मध्ये पुढील विषय परिनियम करून नियमन करावयाचा विषय म्हणून दिलेला आहे. :-

" (8) qualifications, recruitment, workload, code of conduct, terms of office,duties and conditions of service, including periodic assessment of teachers, officers and other employees of the university and the affiliated colleges (except those colleges or institutions maintained by the State or Central Government or a local authority), the provision of pension, gratuity and provident fund, the manner of termination of their services, as approved by the State Government ;"

४. पात्रतेच्या अटी परिनियमांनी निर्धारित करावयाच्या आहेत (शासन निर्णयांनी नव्हे) असा कायदा महाराष्ट्रात १९८६ पूर्वीच होता व उच्च शिक्षण विभागातील शासकीय अधिकाऱ्यांच्या दुर्देवाने आजही तो कायम आहे. परिनियम न करता शासननिर्णयांनी अशा अटी निर्धारित करणे हे संपूर्णपणे बेकायदेशीरपणाचे आहे ही गोष्ट ठामपणे समजावून घेण्याची आवश्यकता आहे. पुढचा प्रश्न स्वाभाविकपणे असा येतो की **भरतीच्या वेळी "नेटसेट" पात्रता परीक्षा सक्तीची करण्याचा परिनियम करण्याची जबाबदारी ही ज्यांची होती त्यांनी कां पार पाडली नाही?** आता नियमबाह्य पात्रता धारण न केल्याबद्दल शिक्षकांना वेठीला धरणे न्यायोचित आहे काय?

५. परिनियम करण्याचा अधिकार १९९४ च्या महाराष्ट्र विद्यापीठ कायद्याच्या कलम ५२ अन्वये विद्यापीठांना देण्यात आलेला आहे. महाराष्ट्रातील कोणत्याही विद्यापीठांनी नेटसेटची पात्रता परीक्षा सक्तीची करणारे परिनियम १९९९ सालापर्यंत केले नाहीत ही सूर्य प्रकाशाइतकी स्पष्ट वस्तुस्थिती आहे. "नेटसेट"च्या परीक्षेची पुरेशी व्यवस्था (माध्यमांचा विचार लक्षात घेऊन) अस्तित्वात आल्याशिवाय अशा प्रकारची सक्ती करण्यामुळे आपण हास्यास्पद होऊ अशी भिती विद्यापीठांना वाटली असल्यास त्याबद्दल विद्यापीठांना दोष देता येणार नाही. अनेक विद्यापीठांनी शासनाला तसे कळविलेसुद्धा, शिवाय १९८६ पासूनच्या वेतनपुनर्रचनेची व्यवस्था करतांना केलेल्या परिनियमांमध्ये पुढील व्यवस्था होती :-

" The same procedure should continue to be in operation till it is suitably replaced by the comprehensive test to be prescribed by the University Grants Commission."

६. "एखादी तरतूद आम्ही पुढे करणार आहोत" असे ज्या दिवशी जाहीर करण्यात येते त्या दिवसापासून ही तरतूद कायदेशीररित्या बंधनकारक होत नाही ही गोष्ट जाहीररित्या समजावून सांगण्याची पाळी यावी हे सुद्धा महाराष्ट्रातील शिक्षकांचे दुर्दैवच आहे. उदाहरणासह ही गोष्ट समजून घेण्याची गरज आहे. इंजिनिअरिंग कॉलेजेससाठी नवीन वेतनश्रेणी लागू करणारा एक शासननिर्णय १८ डिसेंबर १९९९ रोजी महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेला आहे. (क्रमांक Resolution No. RPS 2198/77/TE-6 : Dated the 18th December 1999.) या शासननिर्णयाच्या सातव्या परिच्छेदामध्ये पात्रतेच्या अटीबाबत पुढील तरतूद आहे. :-

" a) Recruitment of teachers at the level of Lecturers shall be from those **who qualify through a qualifying examination, details of which shall be developed by the All India council for Technical Education** and intimated to the State Government and institutions. **Until this operational mechanism is developed, the existing procedure of recruitment will continue in relaxation of this requirement.**"

७. याच सातव्या परिच्छेदामध्ये पुढे आणखी अशीही तरतूद आहे की :-

" The All India Council for Technical Education will lay down the constitution of selection/ promotion committees, **and the existing procedure will remain in vogue till the All India Council for Technical Education does so.**"

उच्च शिक्षण व तंत्र शिक्षण हे दोनही विभाग एकाच खात्यात आहे हे महाराष्ट्राचे सुदैवच म्हटले पाहिजे. वरील तरतुदीचा सरळ अर्थ असा आहे की अखिल भारतीय स्तरावर केलेली व्यवस्था पुढे महाराष्ट्रात आणली जाणार आहे. याची ही फक्त सूचना आहे. आज "पात्रता परीक्षा" इंजिनिअरिंग महाविद्यालयामध्ये सक्तीची करण्यात आलेली नाही. उद्या अखिल भारतीय स्तरावर हा 'मेकॅनिझम' तयार होईल तो महाराष्ट्राला कळविला जाईल, त्यानंतर तो इथे विधीमय माध्यमांच्या द्वारे विधिवतरित्या अमलात येईल. खाजगी महाविद्यालयासाठी 'परिनियम' आणि शासकीय महाविद्यालयासाठी 'भरतीचे नियम' ही सक्तीच्या तरतुदी विधीवत करण्यासाठीची विधिमय माध्यमं आहेत हे विद्यापीठ अनुदान आयोगाने राज्य शासनाला पत्राने वारंवार प्रत्येक वेळी कळविले आहे. इथे कोणी ते वाचायला तयार नाही हा भाग वेगळा.

८. **"करणार आहोत" आणि "केले आहे" यामधला फरक जाहीरपणे सांगण्याची वेळ आलेली आहे.** इंजिनिअरिंग विद्याशाखेमध्ये १८ डिसेंबर १९९९ रोजीच्या शासननिर्णयाने जे करणार आहोत, म्हणून घोषित केले ते प्रत्यक्ष करण्यासाठी किती वर्षं लागतील हे शिक्षकांच्या हातात नाही. हा काळ

***सेट परीक्षा घेण्यासाठी ७ पदांना 'मंत्रालया'ची मंजूरी मिळविण्यास 'मंत्रालया'ला १७ महिने लागले याची शिक्षा शिक्षकांना कशी देता येईल?***

***नेट सेटबाबत शासनाने आज घेतलेली भूमिका ही मूळ विद्यापीठ अनुदान आयोगाच्या योजनेशी व शासन आणि महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ यांच्यामध्ये झालेल्या समझोत्याच्या संपूर्णपणे विरोधात आहे***

कदाचित दोन वर्षांचा, पाच वर्षांचा किंवा दहा - बारा वर्षांचा सुद्धा असू शकेल. हीच शब्द रचना २७.२.१९८९ च्या उच्च शिक्षण विभागाच्या शासन निर्णयामध्ये पुढील शब्दात आहे. :-

"Only those candidates, who, besides fulfilling the minimum qualifications prescribed for the post of a lecturer, Librarian and Physical Education Staff, have qualified in a comprehensive test to be conducted for the purpose will be eligible for appointment. The detailed scheme for conducting the test including its design, the agencies to be employed in the conduct of the test, content, administration etc. will be worked out by the University Grants Commission keeping in view the requirement of the **media of instruction** followed by the different Universities and Colleges and other relevant considerations." पुढे आपण काय करणार आहोत? याचे मार्गदर्शन या शब्दांमध्ये निश्चितपणे आहे. पुढे त्यात असेही म्हटले आहे की,

" The same procedure should continue to be in operation till it is suitably replaced by the comprehensive test to be prescribed by the University Grants Commission." आपण पुढे जे सक्तीचे करणार आहोत अशी घोषणा शासनाने १९८९ मध्ये केली ती पात्रता महाराष्ट्रामध्ये विधीमय माध्यमांच्याद्वारे विधीवतरित्या सक्तीची केव्हा करण्यात आली? या प्रश्नाचे उत्तर उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनीच स्वतःचे स्वतःशी दिले पाहिजे.

९. नेटसेटबाबत शासनाने पुढे अत्यंत चुकीचे धोरण स्वीकारले. "नेट सेट परीक्षा उत्तीर्ण केली असेल तरच ३१ मार्च १९९४ नंतर त्यांना सेवेत ठेवण्यात यावे" असा पहिला हूकुम २ फेब्रुवारी १९९४ च्या शासन पत्रान्वये काढण्यात आला. "३१ मार्च १९९५ पर्यंत नेट सेट परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा" असा दुसरा आदेश ७ मार्च १९९४ च्या पत्रान्वये देण्यात आला. मग त्यानंतर "३१ मार्च १९९६ पर्यंत नेट सेट परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा" असा आदेश २० मार्च १९९४ च्या शासन पत्रान्वये देण्यात आला. परिनियमांनी केलेली व्यवस्था पत्राने मोडून काढण्याच्या या प्रकाराने शेकडो शिक्षकांना गेली अनेक वर्षे अत्यंत मानसिक तणावात काढावी लागली. २ फेब्रुवारी १९९४ ते २० मार्च १९९४ या दोन महिन्याच्या (धड दोन सुद्धा नव्हे) काळातील उच्च शिक्षण विभागाची ही तीन पत्रे पाहिली म्हणजे या साऱ्या प्रकाराची एकंदर हास्यास्पदता लक्षात येते. **विशेष असे की पत्रापत्रीचा हा सारा प्रकार केंद्र शासनाच्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या, परिनियमांच्या व समझोत्याच्या विरोधात होता.**

"विद्यापीठ अनुदान आयोगाने माध्यमासह सर्व तपशील ठरविल्यानंतर जी "निवडीची प्रक्रिया पात्रता परीक्षेसह" येईल ती १९७७ च्या शासन निर्णयांनी विहित केलेल्या "विद्यमान निवड प्रक्रियेला" "सुटेबली रिप्लेसड करील" असे शासन निर्णयात नमूद आहे. विद्यमान व्यवस्था (निवड प्रक्रिया) सुटेबली रिप्लेसड झाली काय? हा यातील खरा प्रश्न आहे व त्याचे उत्तर मा. श्री. दिलीप वळसे पाटील हे उच्च शिक्षणमंत्री झाल्यानंतरच १ जानेवारी २००० च्या दरम्यान ती झालेली आहे असे आहे. सन २००० मध्ये किंवा डिसेंबर १९९९ मध्ये जी पात्रता सक्तीची म्हणून घोषित करण्यात आली ती १९९८ मध्ये सक्तीची म्हणून कशी लागू करता येईल?

**१०.** आणखी एका गोष्टीचा जाहीरपणे व ठामपणे उल्लेख करण्याची आवश्यकता आहे. "शिक्षकीय पदासाठीच्या उमेदवाराने धारण करावयाची भरतीच्या वेळीची पात्रता" हा परिनियमांनी विहित करावयाचा विषय आहे असे १९९४ च्या कायद्याने ठरवून दिलेले आहे. हे परिनियम करण्याचा अधिकार जसा विद्यापीठांना आहे, तसाच तो शासनाला सुद्धा (स्टँडर्ड कोड) आहे, किंबहुना शासनाचा अधिकार हा वरचढ राहील असे कायद्यातच नमूद आहे. शासनाने "स्टँडर्ड कोड" तयार केले असेल तर त्याच्या विरोधात जाणारे परिनियम आपोआप रद्द होतील असे कायद्यातच म्हटले आहे. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ चे कलम ८ चे उपकलम ३ पुढील प्रमाणे आहे :-

"The State Government may in accordance with the provisions contained in this Act, for the purpose of securing and maintaining uniform standards, by notification in the Official Gazette, prescribe a Standard Code providing for the classification, manner and mode of selection and appointment, absorption of teachers and employees rendered surplus, reservation of posts in favour of members of the Scheduled Castes, Scheduled Tribes, and Other Backward Classes, duties, workload, pay, allowances, post-retirement benefits, other benefits, conduct and disciplinary matters and other conditions of service of the officers, teachers and other employees of the universities and the teachers and other employees in the affiliated colleges and recognised institutions (other than those managed and maintained by the State Government, Central Government and the local authorities). When such Code is prescribed, the provisions made in the Code shall prevail, and the provisions made in the Statutes, Ordinances, Regulations and Rules made under this Act, for matters included in the Code shall, to the extent to which they are inconsistent with the provisions of the Code, be invalid."

**११.** शासनाला हा अधिकार १९९४ च्या कायद्याने दिलेला आहे. तो त्यापूर्वी नव्हता असा काही शासकीय अधिकाऱ्यांचा गोड समज आहे व तो खरा नाही. आज १९९४ च्या कायद्यामध्ये हे कलम प्रकरण २ मध्ये आहे त्यापूर्वी **सर्व विद्यापीठाच्या १९७४ च्या कायद्यामध्ये ते कलम प्रकरण १२ मध्ये कलम ७७ अ म्हणून १९७८ पासून तर १९९४ पर्यंत अस्तित्वात होते** एवढाच फरक आहे. याच तरतुदीचा वापर करून शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी स्टँडर्ड कोड १९८४ पासून अस्तित्वात आहे.

**१२.** राष्ट्रीय पात्रता परीक्षा सक्तीची करण्यासाठी **"प्रमाण संहिता" हे विधिमय माध्यम हाती असतांना शासनाने ही पात्रता परीक्षा विद्यापीठ अनुदान आयोगाने विनंती करून सुद्धा सन २००० पर्यंत सक्तीची केली नाही.** याची शिक्षा शिक्षकांना कशी देता येईल? महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने राष्ट्रीय पात्रता परीक्षेला कधीही विरोध केलेला नाही या गोष्टीची नोंद घेणे आवश्यक आहे. २८ मार्च १९९४ रोजी महासंघाच्या कार्यकारी मंडळाने ठराव करून असे नमूद केले की :-

"राष्ट्रीय पात्रता परीक्षेला संघटनेचा विरोध नाही ही गोष्ट स्पष्टपणे नमुद करण्यात येत असून महाराष्ट्रात अशी परीक्षा घेण्याची कोणतीही तयारी महाराष्ट्र शासनाने आजपावेतो केलेली नाही. केंद्र शासनाच्या २२ जुलै ८८ च्या सूचनांमध्ये व महाराष्ट्र शासनाच्या २७ फेब्रुवारी १९८९ च्या

***मूळ नियमात "नेटसेटची पात्रता" आवश्यक आहे, तर परंतुकामध्ये "हे नियम होण्याच्यापूर्वी त्या त्या वेळी अस्तित्वात असलेली किमान विधिमय पात्रता" धारण करणारांना नेटसेटची पात्रता लागू रहाणार नाही असे विहित केले आहे. मूळ नियमातील पात्रता व परंतुकातील पात्रता म्हणजे दोनही ठिकाणी "नेटसेटचीच पात्रता" असा अर्थ मंत्रालयातील अधिकारी लावत आहेत. आपलाच अर्थ खरा आहे या आनंदात ते एवढे बेभान झाले आहेत की दोनही ठिकाणच्या पात्रतेचा अर्थ जर "नेटसेटची पात्रता" असाच आहे हे मान्य केले, तर विद्यापीठ अनुदान आयोगाने आपल्या मूळ नियमाला हे परंतुक जोडण्याचे काही कारणच उरत नाही याचेही भान या अधिकाऱ्यांना राहिलेले नाही.***

## *"९२ च्या शिक्षण सचिवांच्या अखिल भारतीय बैठकीमध्ये ठरल्यानंतरसुद्धा तुमचे सचिव काहीच कृती करीत नाहीत"*

## *विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षांची महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण मंत्र्याकडे तक्रार*

शासन निर्णयामध्ये 'शिक्षक' व 'उमेदवार' असा स्पष्ट फरक करण्यात आलेला आहे. रिफ्रेशर कोर्सेस शिक्षकासाठी असून राष्ट्रीय पात्रता परीक्षा ही उमेदवारासाठी आहे. उमेदवारासाठी असलेल्या अटी शिक्षकांवर लादणे सर्वस्वी गैर आहे."

**१३.** नाशिक येथे ८ व ९ जुलै १९९५ रोजी झालेल्या याच संघटनेच्या कार्यकारी मंडळाच्या व आमसभेच्या बैठकीत संमत केलेल्या वार्षिक अहवालामध्ये पुढील उल्लेख आहे.

"6.1 In the 1987 All India agreement for revision of pay scales, the condition of clearing eligibility test by candidates was provided. The AIFUCTO and MFUCTO are party to this and therefore, we welcome introduction of Eligibility test for candidates, However, its introduction to teachers retrospectively as one by our Government from 1-4-1990 is not acceptable to MFUCTO. The MFUCTO has made it clear that eligibility tests are for candidates who want to become teachers, while Refresher courses are for teachers." संघटनेने आपली ही मतं शासनाला लेखी कळविलेली आहेत.

**१४.** नेटसेट संबंधीच्या २२ डिसेंबर १९९५ च्या शासननिर्णयाबाबत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने दिनांक ७ जानेवारी १९९६ च्या बैठकीत मंजूर केलेल्या ठरावात असे स्पष्टपणे नमुद करण्यात आले होते की :-

"या शासन निर्णयाची काळजीपूर्वक छाननी केल्यास असे दिसून येते की :-

**(अ)** नेटसेट बाबत शासनाची भूमिका विद्यापीठ अनुदान आयोगाच्या, तसेच केंद्र शासनाच्या धोरणाशी व महाराष्ट्र शासनाशी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचा जो समझोता झाला त्याच्याशी पूर्णपणे विसंगत होती याचा कबुलीजबाबच या २२ डिसेंबर १९९५ च्या शासन निर्णयाने दिलेला आहे. **"नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण करण्याची दिनांक ३१.३.१९९६ ची मुदत या आदेशाव्दारे काढून टाकण्यात येत आहे."** हा शासन निर्णयाच्या परिच्छेद ७ (अ) मधील उल्लेख म्हणजे एमफक्टोने याबाबत घेतलेली भूमिका किती बिनचूक होती याचा पुरावाच आहे. तथापि **तदर्थ स्वरूपाच्या नेमणूका देणे, सेवेत असलेल्या अधिव्याख्यात्यांना नेट सेट परीक्षा उत्तीर्ण होण्याची सक्ती करणे, न झाल्यास वार्षिक वेतनवाढ देण्यात न येणे, त्यांची सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विचारात न घेणे, सेवा ज्येष्ठता न देणे या शासन निर्णयातील अटी संपूर्णपणे समझोत्याच्या व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या व केंद्र शासनांच्या सूचनांच्या विरुद्ध आहेत.** त्यामुळे या अटी ताबडतोब मागे घेण्यात याव्या अशी मागणी ही सभा करीत आहे.

**(ब)** केंद्र शासनाच्या २२ जुलै ८८ च्या सूचनांमध्ये व महाराष्ट्र शासनाच्या २७ फेब्रुवारी १९८९ च्या शासन निर्णयामध्ये 'शिक्षक' व 'उमेदवार' असा स्पष्ट फरक करण्यात आलेला आहे. रिफ्रेशर कोर्सेस शिक्षकांसाठी असून राष्ट्रीय पात्रता परीक्षा ही उमेदवारांसाठी आहे. उमेदवारांसाठी असलेल्या अटी शिक्षकांवर लादणे सर्वस्वी गैर आहे." या महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या भूमिकेचा पुनरूच्चार करण्यात येत आहे.

**(क)** "नेटसेट परीक्षा ३१ मार्च १९९४ पर्यंत उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा" असा आदेश **पहिल्या सोमवारी** काढावयाचा, "३१ मार्च १९९५ पर्यंत नेटसेट परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा" असा आदेश **दुसऱ्या सोमवारी** काढावयाचा व "३१ मार्च १९९६ पर्यंत नेटसेट परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा" असा आदेश **तिसऱ्या सोमवारी** काढावयाचा **या स्वतःवर लादून घेतलेल्या विक्षिप्त प्रकारातून उच्च शिक्षण विभागाची आता मुक्तता झालेली आहे ही आनंदाची गोष्ट आहे.**"

**१५.** एका बाजूला महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने ही गोष्ट वारंवार शासनाच्या लक्षात आणून दिली. तर दुसऱ्या बाजूला विधानमंडळ सदस्य या नात्याने गेली अनेक वर्षे आम्ही सभागृहामध्ये वारंवार ही गोष्ट सांगितली आहे. **अगोदर सक्ती व नंतर नियम असे करणे बरोबर नाही, अगोदर नियम करून मगच सक्ती करता येईल. भरती झालेल्या लोकांना परीक्षा पास करण्यासाठी मुदत वाढवून देण्याचा हा प्रश्नच नाही. भरतीच्या वेळी पात्रतेची अट नियमाने सक्तीची करण्याचा प्रश्न आहे.** हे किती वेळा शासनाच्या आम्ही लक्षात आणून दिले आहे याचे तपशील पुढील प्रमाणे :-

(१) "**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, येथे मुदत वाढवून देणे हा प्रश्नच नाही. ... आज तीनचार हजार लोकांचा प्रश्न आहे आणि जी टेस्ट अजून इन्ट्रोड्युस झालेली नाही **ती टेस्ट पूर्वलक्षी प्रभावाने लावली जात आहे. हे चूक आहे. कोणत्या तारखेपासून मराठी माध्यमातून ही टेस्ट लावायची ते आपण ठरवा. पण त्यापूर्वी आज त्यास शासनाने जो पर्याय मान्य केला आहे त्याप्रमाणे निवड झालेल्या शिक्षकांना ही टेस्ट त्यापूर्वी असणार नाही.** असे स्पष्ट आदेश निर्गमित करण्याची गरज आहे. ते आपण केव्हा करणार आहात? हाच माझा प्रश्न आहे? " *(महाराष्ट्र विधानपरिषद - कार्यवाही - गुरुवार, दिनांक १७ मार्च १९९४ - कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड १०१, क्रमांक ३ पृष्ठ ४६-४८)*

(२) "**श्री.बी.टी.देशमुख :** .... माझे म्हणणे असे आहे की, जी टेस्ट आहे. ती रिक्रुटमेंटची एक वेगळी पद्धत आहे. ती पद्धत जोपर्यंत अमलात येत नाही तोपर्यंत परिनियमानुसार झालेली रिक्रुटमेंट १०० टक्के लॉफुल आहे. माननीय चान्सलर यांच्या सहीने आपण ते ठरविले आहे. जो २७ फेब्रुवारी १९८९ चा जी.आर.काढला त्याप्रमाणे स्टॅट्युट झालेले आहे. या सर्व ॲडव्हॅर्टाईजमेंट ॲप्रुव्ह झालेल्या आहेत. नियमाप्रमाणे त्या सर्व रिक्रुटमेंट फरफेक्टली लॉफुल अशा झालेल्या आहेत. ज्यादिवशी आपण नवीन व्यवस्था, नवीन अल्टरनेट ॲरेंजमेंट कराल त्या दिवसापासून ते लागू होईल "सुटेबली रिप्लेस्ड" होईल अशी खरी गोष्ट आहे. **यामध्ये आज सेवेत असलेले जे शिक्षक आहेत त्यांना मुदत वाढवून देण्याचा प्रश्न नाही.** त्यांच्या नेमणूक पत्रामध्ये तसे नाही. त्यांना कधी तसे सांगितले नाही. जाहिरातीमध्ये तसे जाहीर केले नाही, आपण असे म्हणालो की, जेव्हा आमची नवीन पद्धत येईल. मराठी मिडियममध्ये एकही टेस्ट अजूनही कन्डक्ट झाली नाही, म्हणजे अजून ती आली नाही, तेव्हा जुनी पद्धती बदलेल. तोवर १९७७ सालची जुनी निवड प्रक्रिया चालू राहील. तेव्हा त्यांना मुदत वाढवून देण्याचा प्रश्न नाही. ही नवीन व्यवस्था केव्हा सुरु करणार? **आपण १९९६ असे सांगत आहात पण मी म्हणतो की, त्यापूर्वी करा."** *(महाराष्ट्र विधानपरिषद - कार्यवाही - गुरुवार, दिनांक १७ मार्च १९९४ - कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड १०१, क्रमांक ३ पृष्ठ ४९-५०)*

(३) "**श्री.शरद पवार :** (मुख्यमंत्री) ..... तिसरी गोष्ट म्हणजे जे यापूर्वी शिक्षक झालेले आहेत आणि त्यांना याची आवश्यकता नाही. **असे सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख सांगत आहेत. तर ती वस्तुस्थिती असेल तर त्यासंबंधीचा अपवाद करण्याची तयारी, राहील"** *(महाराष्ट्र विधानपरिषद - कार्यवाही - गुरुवार, दिनांक १७ मार्च १९९४ - कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड १०१, क्रमांक ३ पृष्ठ ५०)*

(४) "**श्री.बी.टी.देशमुख :** .... युनिव्हर्सिटी ग्रांट कमिशनने यांना रिपिटेडली सांगितले की, तुम्ही तुमच्या राज्यामध्ये नेट-सेट ची व्यवस्था करा. दुसरे असे सांगितले की, कायद्यात हे टाका, परिनियमामध्ये टाका, अध्यक्ष महाराज, आपल्याला माहीत आहे की, परिनियम ५१ (८) प्रमाणे विद्यापीठ करू शकते. **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ चे कलम ८ (३) प्रमाणे स्टँडर्ड कोडच्या माध्यमातून राज्य शासन करू शकते. शासनाने ते आजपर्यंत सुद्धा केलेले नाही. या शिक्षकांच्या सेवाशर्थी या स्टॅट्युटने ठरल्या जातील असे कायद्यामध्ये म्हटले आहे. असे असतांना सुद्धा ही कार्यवाही आजपावेतो पूर्ण**

## *एक म्हणजे नेट सेट झालेले पुरेसे उमेदवार उपलब्ध होतील अशी व्यवस्था करणे व दुसरे म्हणजे नेटसेट ही पात्रता उमेदवारावर सक्तीची करणारा कायदा (परिनियम) करणे या दोन गोष्टी शासनाने वेळीच न केल्याचे हे परिणाम*

***मा. मुख्यमंत्री, मुख्य सचिव, उच्च शिक्षणमंत्री, वित्तसचिव, उच्च शिक्षण सचिव यांनी सतत पाच दिवस, पाच पाच तास बसून काही ठाम निर्णय घेतले. त्या बैठकीमध्ये घेण्यात आलेला एक महत्वाचा निर्णय असा की केंद्र शासनाच्या सूचनेप्रमाणे महाराष्ट्रात करावयाचे. त्याला वित्त विभागाची मान्यता होती. याप्रमाणे २७.२.१९८९ चा शासननिर्णय निर्गमित झाल्यावर केंद्राच्या अटीमध्ये नसलेल्या अनेक अटी महाराष्ट्रातल्या अधिकाऱ्यांनी घुसडल्या***

**केली नाही.** माध्यम लक्षात घेवून एकही परीक्षा महाराष्ट्रात झाली नव्हती आणि त्यांनी हुकूम काढले." *(महाराष्ट्र विधानपरिषद - कार्यवाही - गुरुवार, दिनांक २६ मार्च १९९८ - कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड ११४, क्रमांक ९ पृष्ठ ५६)*

(५) "**श्री.बी.टी.देशमुख :** .... महाराष्ट्रात फक्त आमच्या नोकरशाहीने करायला नको ते केले आहे. करायला पाहिजे होते ते केले नाही. काय करायला पाहिजे होते? सभापती महोदय, यु.जी.सी. ने त्यांना जे लिहिले आहे ते मी सांगतो. १४ मार्च १९९१ ला असे लिहिले की, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सचिवांनी आमच्या सचिवांना लिहिले "It would be appropriate that there is no delay in this regard. specifically following actions are required Acceptance by the State Government ....." ही पहिली अट आहे व दुसरी अट त्यांनी टाकली "Amendment of relevant university statutes for prescribing this as minimum qualification" १४ मार्च १९९१ ला आमच्या सचिवांना त्यांनी एक पत्र लिहिले त्यानंतर १५ जून १९९३ ला युजीसीच्या सचिवांनी आमच्या सचिवांना पुन्हा पत्र लिहिले व १९९३ मध्ये पुन्हा हेच म्हटले आहे त्यामुळे मी पुन्हा ते वाचून दाखवित नाही. माझे म्हणणे हे आहे की आपण म्हणता ते बरोबर आहे. ८० टक्के असिस्टन्स दिला हे ज्या पत्रांनी दिले **त्यामध्ये नेमणुका तदर्थ हे कुठेच नाही. इन्क्रीमेंट देऊ नका हे कुठेच नाही, सेवा धरू नका हे कुठेच नाही, नेटसेट रिक्रुटमेंट लेव्हलला कायदा करून कंपलसरी क्वॉलिफीकेशन म्हणून तुम्ही प्रिस्क्राइब करा त्यासाठी स्टॅट्युट करा असे म्हटले आहे. ते करा तुम्ही. त्याला आमची मनाई नाही. मी मागेही म्हणालो की, मुदत वाढवू नका, उद्या करा ना?** "Amendment of relevant University statute for prescribing this as minimum qualification" असे युजीसीने म्हटले ते तुम्ही करा तुम्ही कायदा अजूनही केला नाही. कायद्याने जे प्रिस्क्राईब करावयाचे आहे ते न लावता बेकायदेशीरपणे लावणे बरोबर नाही. आणि म्हणून माझे पुन्हा म्हणणे आहे की चार गोष्टी युजीसीच्या कोणत्या पत्रामध्ये आहेत? टेम्परररी या लोकांना वर्षानुवर्षे नेमा. इन्क्रीमेंट देऊ नका हे कुठे आहे युजीसीमध्ये ते सांगा? " *(महाराष्ट्र विधानपरिषद - कार्यवाही - गुरुवार, दिनांक २६ मार्च १९९८ - कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड ११४, क्रमांक ९ पृष्ठ ५८)*

(६) "**श्री.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, आम्हाला सवलत वगैरे नको. हा हक्काचा व कायद्याचा प्रश्न आहे. या ठिकाणी चार अटी कोठे आहेत. माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी ज्या चार अटी लादलेल्या आहेत त्या कोठे आहेत? मध्यवर्ती सरकारने २२ जुलै १९८८ च्या पत्रान्वये २९ अटी घातल्या आहेत त्या आम्हाला मान्य आहेत. त्यामध्ये या अटी कोठे आहेत? २४ महिन्यापेक्षा जास्त काम केल्यानंतर त्यांना कन्फर्म करण्यात यावे असे आहे त्यामध्ये, तर यानी तदर्थ नेमा असा जी.आर. काढला आहे. ही अट त्यामध्ये कोठे आहे? या ठिकाणी केंद्र सरकारने ८० टक्के असिस्टन्स दिले आहे ते शासन आपल्याला सांगत आहे की नेटसेटची व्यवस्था करा. कायदे बदला. That is the suitable replacement of old system by new system. या ठिकाणी आज आपण ते केलेले नाही. या ठिकाणी स्टॅट्युट न करता सारे चालू आहे. दोन वर्षाने कन्फर्म करा असा परिनियम आहे. त्याबाबतीत आज स्टॅट्युट आहेत म्हणून या शासनाने घातलेल्या अटी या ठिकाणी केंद्र शासनाने वा युजीसीने ज्या अटी घातल्या नाहीत, त्या अटीमध्ये हे नाही. या सरकारने ह्या कोठून काढल्या आहेत? ब्युरॉक्रसीनेच हे सगळे काही केले आहे. मी यापूर्वी म्हणालो ते पुन्हा म्हणू इच्छितो. It is totally local production produced by mantralaya in Maharashtra. हे सरकार मात्र या चार अटी या ठिकाणी टाकू इच्छित आहे. २४ महिने नोकरी केल्यानंतर कन्फर्म करण्यात येते. या ठिकाणी थेट रिक्रुटमेंटला तुम्ही तुमचे कायदे करा. या ठिकाणी केंद्र सरकारने ८० टक्के असिस्टन्स दिला आहे. म्हणून या ठिकाणी या सरकारने या ज्या चार अटी घातलेल्या आहेत, त्या ताबडतोबीने मागे घेण्याची गरज आहे. **कारण या ठिकाणी केंद्र सरकारच्या अटीचा भंग होत आहे. सभापती महोदय, यातील एकही अट केंद्र शासनाने किंवा युजीसीने घातलेली नाही."** *(महाराष्ट्र विधानपरिषद - कार्यवाही - गुरुवार, दिनांक २६ मार्च १९९८ - कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड ११४, क्रमांक ९ पृष्ठ ६०)*

(७) "**श्री.बी.टी.देशमुख :** .... पुणे युनिव्हर्सिटीला नेट-सेट परीक्षा सुरू करण्यासाठी त्यांना एक चपरासी धरून पाच जागा पाहिजे होत्या, त्याकरिता मंत्रालयातील शिक्षण विभागाला मंत्रालयातील वित्त विभागाने १५ महिने मान्यता दिली नाही. हे यांचे कर्तव्य आहे. मग तुम्ही त्यासाठी लोकांना पनिशमेंट कां देता? मंत्रालयातल्या मंत्रालयात एका विभागाची दुसऱ्या विभागाला मान्यता मिळायला १५ महिने लागतात व आम्ही सभागृहात भांडण काढल्यावर मान्यता मिळाली. या ठिकाणी तुम्ही जे करायला नको ते केले आहे या ठिकाणी ज्या अटी आहेत त्यामध्ये हे नाही. **जे करायला नको ते केले आहे आणि जे करायला पाहिजे ते अजूनही करीत नाही.** *(महाराष्ट्र विधानपरिषद - कार्यवाही - गुरुवार, दिनांक २३ एप्रिल १९९८ - कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड ११४, क्रमांक २३ पृष्ठ ४४)*

(८) "**श्री.अशोक मोडक :** ....माझा प्रश्न असा आहे की, जो सहस्त्रो प्राध्यापकांच्या जीवाशी खेळ चालला आहे तेव्हा हे यापूर्वी कां लक्षात आले नाही ? याच्या १४ क्रमांकाच्या परिच्छेदामध्ये सुरवातीला काय म्हटले आहे? यात म्हटले आहे की, या विशिष्ट परिपत्रकामुळे या अगोदरच्या तरतुदी निष्प्रभावित केल्या जातील म्हणजे १९ सप्टेंबर १९९१ व २४ डिसेंबरच्या या दोन तरतुदी आहेत. **परंतु सर्वात शेवटी जो प्रोव्हीजो आहे तो अतिशय महत्वाचा आहे.** "Then requisite minimum qualification" हा जो शब्द समुह आहे. That is to be understood. एकदा आपण हे मान्य केले आहे. एखाद्या व्यक्तीच्या नेमणुकीच्या पहिल्याच दिवशी ज्या कोणत्या क्वालिफिकेशन्स आवश्यक असतील त्यासंबंधी हा प्रोव्हीजो दिला गेला आहे. स्वाभाविकपणे त्या अगोदरच्या तरतूदी निष्प्रभ केल्या जातील असे म्हटले आहे त्यात. हे विसंगत आहे हे सरळ-सरळ दिसते. म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, या संदर्भामध्ये आवश्यक क्लॅरिफिकेशन जर डिसेंबरमध्ये मागविले जाते ते या अगोदरच का मागविले नाही ? दुसरा प्रश्न असा आहे की, १९९१ सालापासून या नेटसेटच्या परीक्षांचा घोळ चालूच आहे त्याला प्राध्यापक जबाबदार नाहीत आणि एकाअर्थाने राज्य शासन जबाबदार आहे तर आता राज्यशासनाने हे जे दोन प्रोव्हीजो जोडलेले आहे त्याचा आधार घेवून मा.सदस्य बी.टी.देशमुख म्हणाले त्याप्रमाणे त्याचा नक्की गंभीरपणे विचार करावा." *(महाराष्ट्र विधानपरिषद, कार्यवाही, गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर २००० - पृष्ठ ३ जी १)*

(९) "**श्री.वसंत काळे :** यू.जी.सी.ने **जो क्लॉज/प्रोव्हीजो केला आहे त्याचा अर्थ शासन चुकीचा काढत आहे** आणि शासन क्लॅरीफिकेशन मागण्याचा खटाटोप करीत आहे. आमचे सचिव त्या ठिकाणी जाऊन आले आणि त्यांनी

***३१ मार्च १९९४ ला त्यांना सेवामुक्त करा ही अट केंद्राची होती का ? ३१ मार्च १९९५ ला त्यांना सेवामुक्त करा ही अट केंद्राची होती का ? ३१ मार्च १९९६ ला त्यांना सेवामुक्त करा ही अट केंद्राची होती का ? त्यांना ॲडहॉक नेमणूका द्या, हे केंद्राने सांगितले होते काय? त्यांच्या वेतनवाढी रोखून ठेवा, हे केंद्राने सांगितले होते काय? त्यांना वरिष्ठ जागावर प्रमोशन देऊ नका हे केंद्राने सांगितले होते काय?***

***अगोदरच शिक्षण क्षेत्रामध्ये फार मोठ्या प्रमाणावर चाललेल्या दुकानदारीला व भ्रष्टाचाराला "युरिया, सुफला व सुपर फॉस्पेट" या दर्जाचे "तदर्थ नेमणुकांचे" रासायनिक खत पुरविण्याच्या या निंद्य प्रकाराची जेवढी करावी तेवढी निर्भत्सना थोडीच आहे.***

चर्चा केली असे मा. मंत्री महोदयांनी सांगितलेले आहे. या चर्चेमध्ये असे काही ठरले आहे काय, शासनाने एक पत्र पाठवावयाचे आणि यांनीच तिकडे जाऊन उत्तर लिहून आणावयाचे आणि पोरांचा बळी घ्यायचा. हे शासन सचिव चालवितात की मंत्री चालवितात असा संभ्रम यामधून निर्माण होतो. त्यांच्या स्टेटमेंटमध्ये त्यांनी असे सांगितले की, सचिव तेथे गेले आणि त्यांनी जे सांगितले त्याचा उल्लेख या ठिकाणी करण्यात आला. मग हे पॅकेज ठरलेले आहे काय? असे कटकारस्थान ठरलेले आहे काय ? महाराष्ट्र शासनाने येथील जनतेला असे सांगितले की, आम्ही याचा परत खुलासा युजीसीकडे मागवितो आणि सचिवांनी जावून युजीसीकडून त्यांना पाहिजे तो खुलासा आणावयाचा. तरी अशा स्वरुपाचे पॅकेज किंवा कट ठरलेला आहे काय ? चुकीचे इंटरप्रिटेशन करुन या पोरांची कत्तल करण्याचा जो उद्योग आहे तो बंद करुन शब्दशः अर्थ घेऊन या प्रोव्हीजो प्रमाणे या १०,००० प्राध्यापकांना आपण कायम करणार आहात काय ?" *(महाराष्ट्र विधानपरिषद, कार्यवाही, गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर २००० - पृष्ठ ३ एच २)*

**मुदत काय वाढवून देता? हा मुदत वाढविण्याचा प्रश्न नाही. शासनाने कायदा वा नियम करुन विधिवतरित्या विधिमय माध्यमांच्याद्वारे राष्ट्रीय पात्रता परीक्षा सक्तीची करण्याचे पाऊल आणखी मुदत न वाढविता उचलण्याची गरज आहे, हे जसे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने लक्षात आणून दिले तसे आम्ही वेगवेगळ्या विधानमंडळ सदस्यांनी शासनाच्या लक्षात आणून दिले हे वरील ९ उदाहरणावरून सहज लक्षात येईल.** सन २००० साल येईपर्यंत शासनाने त्यावर कोणतीही कारवाई केली नाही हा इतिहास आहे.

१६. राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांनी केंद्र शासनाच्या व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनांप्रमाणेच महाराष्ट्रात अम्मलबजावणी करण्यात येईल असे १९८९ मध्ये लेखी ठरवून दिले. त्यानंतर राज्याच्या मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी केंद्र शासनाच्या व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनांप्रमाणेच महाराष्ट्रात अम्मल केला जाईल असे १९९९ मध्ये सभागृहात सांगितले व बाहेर संघटनेला सांगितले असे असतांना केंद्र शासनाने व विद्यापीठ अनुदान आयोगाने न लावलेल्या अटी (तदर्थ नेमणुका, बढती न देणे, वेतनवाढ न देणे) महाराष्ट्रातील "डेस्क ऑफीसर" वर्षानुवर्षे लादतात ही मोठ्या अचंब्याची गोष्ट आहे. महाराष्ट्र विधानपरिषद - कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड ११४, क्रमांक ९ पृष्ठ ६१ वर नोंदविण्यात आलेले गुरुवार, दिनांक २६ मार्च १९९८ रोजी झालेल्या चर्चेचे पुढील अधिकृत प्रतिवेदन पहा :-

"**श्री. अरुण मेहता :** सभापती महोदय माझा हरकतीचा मुद्दा आहे. मा. सदस्य डॉ. अशोक मोडक, मा. सदस्य श्री.बी.टी.देशमुख आणि इतर सहकारी सातत्याने हा मुद्दा मांडीत आहेत की, जे ८० टक्के असिस्टन्स मिळते त्याच्याकरिता केंद्र सरकारने किंवा युजीसी ने अटी घातलेल्या नाहीत त्या अटी महाराष्ट्र सरकार कशा घालू शकते? ज्या अटी घातल्या आहेत त्यांना अनुलक्षून अटी घातल्यावर त्याला कुणाचाही विरोध नाही. आपणही त्या विषयी विचारले आहे. तेव्हा पहिल्यांदा ज्या कोणत्या ८० टक्के असिस्टन्सच्या संदर्भात अटी असतील तर त्या समोर येवू द्या. याला कारण असे की एका बाजूला सातत्याने सांगितले जाते की या अटी नाहीत आणि परिच्छेदच्या परिच्छेद उद्धृत करतांना माणसे दिसतात. दुसऱ्या बाजूने आपण म्हणता की त्यामध्ये ८० टक्के असिस्टन्सच्या संदर्भात अटी आहेत. त्या वाचून दाखविणे क्रमप्राप्त आहे. म्हणून माझा हरकतीचा मुद्दा असा की, या अटी सभागृहासमोर आल्या की, सेटनेटच्या संदर्भात सर्व सेटराईट होईल.

**श्री. दत्ता राणे :** त्या अटी आता माझ्याजवळ नाहीत त्या मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**श्री. अरुण मेहता :** तर मग लक्षवेधी सूचना राखून ठेवा.

(गोंधळ)

**उपसभापती :** माननीय सदस्य नेमका प्रश्न असा विचारीत आहेत की युजीसी कडून, केंद्र सरकारकडून वाढीव पगारासाठी ८० टक्के अनुदान येते त्याबाबतीत कोणत्याही प्रकारच्या अटी नाहीत असे ते अतिशय खात्रीपूर्वक ठामपणे सांगत आहेत. अशाप्रकारच्या कोणत्याही अटी युजीसीच्या परिपत्रकामध्ये नाहीत आणि आपण सांगत आहात त्या अटी आहेत परंतु त्या माझ्याजवळ आता नाहीत.

**श्री.दत्ता राणे :** सभापती महोदय, याबाबत शासनाला युजीसीबरोबर कन्सल्ट करावे लागेल. त्यानंतर यासंबंधी निर्णय घेतो."

१७. केंद्र शासनाप्रमाणे व युजीसी प्रमाणे करू असे ठरल्यानंतर सुद्धा शिक्षकांच्या जीवनाचे वाटोळे करणाऱ्या अटी आपण लादतो. त्या अटी केंद्राकडून आलेल्या आहेत की नाहीत याची माहितीसुद्धा अधिकारी मंत्रिमहोदयांना देत नाहीत व सभागृहात मंत्र्यांची फजिती होत असतांना गॅलरीत बसलेले अधिकारी गालातल्या गालात हसत असतात ही अशीच एक 'हसरी' चर्चा जी गुरुवार, दिनांक २६ मार्च १९९८ रोजी झाली तीचे महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड ११४, क्रमांक ९ पृष्ठ ६२ वर नोंदविण्यात आलेले प्रतिवृत्त पुढील प्रमाणे :-

"**प्रा.बी.टी.देशमुख :** युजीसीने स्पष्ट सूचना दिल्या आहेत. त्यांच्या बरोबर कन्सल्ट करण्याचा प्रश्नच नाही. त्यांनी जे सांगितले नाही ते तुम्ही केले आता त्यांना कशासाठी कन्सल्ट करता? विथड्रा युवर लोकल प्रॉडक्शन फर्स्ट. माझ्याजवळ त्या अटी आहेत. आमचे हे दुर्दैव की त्या तुमच्या जवळ नाहीत. तर मग ही लक्षवेधी सूचना राखून ठेवा.

**उपसभापती :** युजीसीच्या स्कीममध्ये नाही ते त्यांनी मान्य केले.

**श्री. पी.जी.दस्तुरकर :** म्हणूनच ही लक्षवेधी राखून ठेवा.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, केंद्र शासनाच्या व युजीसीच्या त्या अटींमध्ये या गोष्टी नाहीत म्हणून माझे असे म्हणणे आहे की ही लक्षवेधी सूचना राखून ठेवा.

(गोंधळ)

**श्री. अरुण मेहता :** सभापती महोदय, माझ्या हरकतीच्या मुद्यावर उत्तर आले नाही. आपण सांगितले व माननीय सदस्यांनीही म्हटले की आपण अटी वाचून दाखवा. परंतु त्यांच्याजवळ नाहीत माझा हरकतीचा मुद्दा अपहेल्ड झाला. म्हणून त्या आधारावर आपण लक्षवेधी सूचना राखून ठेवली पाहिजे.

**श्री.सुरेश पाटील :** सभापती महोदय, ज्या तीन अटी सांगितल्या आहेत त्या अटींचा आधार घेवून मंत्रिमहोदय वारंवार सांगत आहेत त्या काय आहेत त्या सांगाव्यात अन्यथा ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी.

**उपसभापती :** त्या अटी त्यांच्याजवळ नाहीत म्हणून ते सांगू शकत नाहीत.

**श्री. अरुण मेहता :** तर मग ही लक्षवेधी सूचना राखून ठेवा.

(गोंधळ)

**श्री. अरूण मेहता :** सभापती महोदय when the minister concerned has incomplete information about the issue तेव्हा लक्षवेधी सूचना राखुन ठेवली पाहीजे दुसरा काय पर्याय आहे.

**उपसभापती :** याला दुसरा काहीच पर्याय नाही."

१८. बुधवार, दिनांक १३ सप्टेंबर २००० रोजी मा. सभापतींच्या विधानभवनातील दालनामध्ये एक बैठक दुपारी ३ वाजता बोलविण्यात आली होती. बैठकीची सूचना विधानमंडळ सचिवालयाने काढली होती. तपशीलवार कामकाजपत्रिका व सहपत्रे सुचनेसोबत होती. विद्यापीठ अधिनियमाबाबतचे सन २००० चे विधानसभा विधेयक क्रमांक ४४ विधानसभेकडून मंजूर होऊन विधानपरिषदेकडे आलेले होते. त्याला आम्ही २८ सुधारणा सुचविल्या होत्या. श्री. प्रकाश जावडेकर यांनी काही सुधारणा

***मा. उच्च न्यायालयाच्या निवाड्यामध्ये या अटीबाबत "This will however, not apply to the appointments already made" अशा प्रकारचा स्पष्ट उल्लेख आहे.***

***एखादी गोष्ट सक्तीची करावयाची असेल तर, प्रथम त्यासाठी कायदा करावा लागतो. प्रथम सक्ती व नंतर कायदा, हे कायद्याच्या राज्याचे लक्षण नव्हे. पण एवढे कळण्यासाठी सुद्धा कोणीतरी मंत्रालयात हायकोर्टाचा हा निर्णय वाचला पाहिजे ना? खरे म्हणजे कायद्याचे एवढे प्राथमिक ज्ञान होण्यासाठी हायकोर्टाचा निर्णय वाचण्याची सुद्धा गरज कां पडावी?***

सुचविल्या होत्या. विधानपरिषदेसमोर पुन्हा विधेयक येण्यापूर्वी या सर्व सदस्यांच्या सुधारणांबाबत मा. सभापतींच्या दालनामध्ये बैठक घेऊन त्या प्रत्येक सुधारणेबाबत सदस्यांचे काय म्हणणे आहे ते ऐकून घ्यावे. त्यातील काही सुधारणा स्वीकारता येतात काय? त्याचा विचार करावा असा उच्च स्तरावर निर्णय झाला होता व त्या प्रमाणे ही बैठक आयोजित करण्यात आली होती.

**१९.** बुधवार, दिनांक १३ सप्टेंबर २००० रोजी उपरोक्त बैठकीला उपस्थित रहाण्यासाठी मी मुंबईला होतो. सकाळी मराठवाड्यातील काही नेटसेटग्रस्त तरुण प्राध्यापक माझ्या निवासस्थानी आले व मला सांगायला लागले. "विधानपरिषद सदस्य श्री. वसंतराव काळे यांनी मा. उच्च शिक्षण मंत्र्यांची वेळ घेतलेली आहे. आज दुपारी ५.०० वाजता मा. उच्च शिक्षणमंत्र्यांच्या मंत्रालयातील दालनामध्ये त्यांनी आमचे म्हणणे ऐकून घेण्याचे मान्य केलेले आहे. यावेळी आपणसुद्धा उपस्थित रहावे." "मला आज दुसरी एक महत्त्वाची बैठक आहे. शिवाय तुम्ही म्हणता या बैठकीला निमंत्रणाशिवाय हजर रहाणे मला योग्य वाटत नाही." असे मी या प्राध्यापक मित्रांना सांगितले. थोड्यावेळाने श्री. वसंतराव काळे भेटले. त्यांनी सुद्धा "५.०० वाजता मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी वेळ दिलेली आहे," असे सांगितले. मी त्या बैठकीला यावे अशी त्यांनी विनंती केली. त्यावर "आज दुपारी ३.०० वाजता विद्यापीठ विधेयकाबाबतीत बैठक आहे ती बराच वेळ चालेल. मा. उच्च शिक्षण मंत्री तेथे आहेत, तेव्हा ५.०० वाजताची बैठक कशी होईल?" असे मी त्यांना विचारले. "शिवाय नेटसेटची बैठक काही मोजक्या निमंत्रितांसाठीच असेल तर तेथे मी येणे योग्य होणार नाही" ही माझी भावना मी श्री. वसंतराव काळे यांना सांगितली.

**२०.** मा. सभापतींच्या अध्यक्षतेखाली १३.९.२००० रोजी दुपारी ३.०० वाजता विद्यापीठ विधेयकाबाबतची बैठक सुरू झाली. मा. सभापती श्री. ना.स.फरांदे हे अध्यक्षस्थानी होते. शासनाच्या वतीने मा. उच्च शिक्षण मंत्री मा. श्री. दिलीप वळसे पाटील, मा. उच्च शिक्षण सचिव व इतर अधिकारी उपस्थित होते. विधानपरिषदेतील संबधीत सदस्य या बैठकीला उपस्थित होते. प्रत्येक सुधारणेवर मोकळेपणाने अनौपचारिकरीत्या चर्चा झाली. त्यातील अनेक सुधारणा पुढे स्वीकारल्या गेल्या. चर्चा बराच वेळ चालली. ५.०० वाजायला आले तेव्हा मा. उच्च शिक्षणमंत्री व सचिव एकमेकाकडे पहायला लागले. आमची चर्चा बराच वेळ चालेल असे दिसत होते. तेव्हा "५.०० वाजताच्या ऐवजी आपण ६.०० वाजता बसू असे कळवा" असे उच्च शिक्षण मंत्र्यांनी सचिवांना सांगितले. त्याप्रमाणे तसा निरोप मंत्रालयात कळविण्याची व्यवस्था झाली. ६.०० वाजत आले तरी आमची बैठक सुरुच होती. आणखी एखादा तास चालेल असे दिसत होते. पुन्हा उच्च शिक्षणमंत्री व सचिव एकमेकाकडे पहायला लागले.

**२१.** विद्यापीठ विधेयकाबाबत चाललेल्या या बैठकीमध्ये ते एकमेकांकडे कां पहात होते हे इतरांच्या लक्षात येण्याचे काही कारण नव्हते पण मला सकाळी याबाबतचे संदर्भ ठाऊक झालेले होते. संध्याकाळी ६.०० वाजता आम्हा सर्वासमक्षच हे बोलणे झाले. उच्च शिक्षण सचिव मा. उच्च शिक्षण मंत्र्यांना म्हणाल्या "येथे वेळ बराच लागेल आपण या ठिकाणचे काम आटोपून घेऊ, तिकडची बैठक रद्द करू व नंतर केंव्हा तरी ठेऊ" त्यावर आम्हा सर्वासमक्ष मा. उच्च शिक्षणमंत्री म्हणाले **"ती बैठक रद्द होणार नाही. मी त्यांना बऱ्याच अगोदर वेळ दिलेली आहे. अनेक लोक बाहेर गावांहून आलेले आहेत. मी मंत्री आता झालो. पुष्कळ दिवस कार्यकर्ता होतो. प्रश्न समजून घेण्यासाठी आपणच वेळ द्यायची व नंतर बैठक रद्द करायची हे मला योग्य वाटत नाही. तास दोन तास मागे पुढे होईल पण ती बैठक आजच होईल."** असे त्यांनी सचिवांना सांगितले व लगेच मा. सभापतींकडे वळून ते म्हणाले "नेटसेटच्या मंडळीचे म्हणणे ऐकूण घेण्यासाठी ५.०० वाजता मी मंत्रालयातील माझ्या दालनात एक बैठक बोलाविली होती. त्यांना ६.०० वाजताची वेळ मघा कळविली पण आपल्याला आणखी एखादा तास लागेल असे दिसते, तेव्हा आपली ही बैठक संपल्यावर आपल्या या दालनात बैठक घेण्याची आपण परवानगी दिली तर त्या लोकांना इकडेच बोलावून घेता येईल व ती बैठक येथेच घेणे आम्हाला सोईचे होईल" त्यावर मा. सभापती श्री. ना.स. फरांदे यांनी "एक पुष्कळ दिवस पडून असलेला प्रश्न सोडविण्यासाठी आमच्या (मा. सभापतींच्या) समिती दालनाचा उपयोग होतो ही चांगली गोष्ट आहे. मला त्यात आनंद आहे." असे सांगीतले त्याप्रमाणे निरोप गेले.

**२२.** श्री. वसंतराव काळे व त्यांचे शिष्टमंडळ मंत्रालयातून विधानभवनात पोचले. जवळजवळ सायंकाळी सात साडेसात वाजता विद्यापीठ विधेयकाबाबतची त्या दिवशीची बैठक संपली. बैठक संपल्यावर सर्व लोक निघून जात असतांना मा. उच्च शिक्षणमंत्री मला उद्देशून म्हणाले "बी.टी. सर! आपण थांबा! नेटसेटच्या प्राध्यापकांची बैठक आहे. एकदा सर्व ऐकून घ्यायचे आहे." मा. सभापतींच्या विधानभवनातील समिती दालनामध्ये ही बैठक बुधवार, दिनांक १३ सप्टेंबर २००० रोजी रात्रौ साडेसात - आठ वाजताच्या दरम्यान सुरू झाली. श्री. वसंतराव काळे यांच्या नेतृत्त्वाखाली आलेल्या शिष्टमंडळाशी अनौपचारिक चर्चा, असे बैठकीचे स्वरूप होते. मा. उच्च शिक्षणमंत्री स्वतः अध्यक्षस्थानी होते. जवळजवळ दोन एक तासांचा वेळ उच्च शिक्षणमंत्र्यांनी या कामासाठी दिला. मी स्वतः पूर्ण वेळ या चर्चेला हजर होतो.

**२३.** या बैठकीमध्ये शिष्टमंडळाच्या नेत्यांचे व सदस्यांचे म्हणजे मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी ऐकून घेतले. मी सुद्धा चर्चेत सहभागी होऊन याबाबतचे मुद्दे मांडले. "मी तुम्हा लोकांचे म्हणणे ऐकून घेतले आहे शासनाच्या स्तरावर याचा आम्ही योग्य तो विचार करू" असे मंत्रिमहोदयांनी सांगितले व ही बैठक संपली. त्यानंतर गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर २००० रोजी आमची या विषयावरील लक्षवेधी सूचना सभागृहामध्ये चर्चेसाठी येणार होती. त्यापूर्वी २-३ दिवस अगोदर मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी नागपूर विधानभवनातील त्यांच्या दालनामध्ये प्रा.बी.टी.देशमुख व श्री. वसंतराव काळे यांना चर्चेसाठी बोलाविले. उच्च शिक्षण सचिवापेक्षा खालचे ३-४ अधिकारी यावेळी उपस्थित होते. शिक्षण सचिव लक्षवेधी सूचना असल्याच्या अगोदरच्या दिवशी येणार आहेत. असे सांगण्यात आले. खुद्द उच्च शिक्षण मंत्र्यांच्या हजेरीत व अध्यक्षतेखाली ही अनौपचारिक चर्चा झाली.

**२४.** उच्च शिक्षणमंत्र्यांच्या दालनामध्ये झालेल्या या चर्चेतील काही भाग नमूद करण्यासारखा आहे. लक्षवेधी सूचनेवर सभागृहात मंत्रिमहोदयांचे प्रथम लेखी निवेदन होते व त्यानंतर त्यावर चर्चा होते. हे लेखी निवेदन विभागातील अधिकाऱ्यांनी सचिवांच्या नेतृत्त्वाखाली तयार केलेले असते. त्यावर मंत्र्यांची संमती झाल्यावर ते मंत्र्यांचे निवेदन होते. सभागृहात वितरित केल्या जाते. २५ जुलै २००० रोजी मुंबई अधिवेशनात असेच एक निवेदन वितरित झाले होते. त्यादिवशी त्यावर चर्चा झाली नाही हा भाग वेगळा. शासनाच्या त्या लेखी निवेदनामध्ये शेवटचे वाक्य पुढील प्रमाणे होते :-

"वरील तरतुदी लक्षात घेता व दिनांक १९.९.१९९१ च्या अधिसूचनेनुसार शिक्षक पदाकरिता नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण असणे ही आवश्यक अट असल्याने सेवेत असलेले बिगर अर्हताधारक अधिव्याख्याता नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण नसल्याने या शिक्षकांना, त्यांच्या सेवा नियमित करणे, त्यांना वरिष्ठ श्रेणी/निवडश्रेणीचा लाभ देणे याचा लाभ देता येणार नाही."

**२५.** महाराष्ट्रामध्ये नेटसेटची पात्रता परीक्षा आतापावेतो विधीवतरित्या सक्तीची करण्यात आलेली नसतांना तुम्ही ती सक्तीची कशी काय करू शकता? असा मी प्रश्न काढला तेंव्हा त्यावर एक अधिकारी मंत्रिमहोदयांच्या समक्ष असे म्हणाले की, "विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १९.९.१९९१ च्या अधिसूचनेप्रमाणे ही पात्रता परीक्षा सक्तीची करण्यात आलेली आहे." त्यावर

***केंद्र शासनाच्या २२ जुलै ८८ च्या सूचनांमध्ये व महाराष्ट्र शासनाच्या २७ फेब्रुवारी १९८९ च्या शासन निर्णयामध्ये 'शिक्षक' व 'उमेदवार' असा स्पष्ट फरक करण्यात आलेला आहे. रिफ्रेशर कोर्सेस शिक्षकांसाठी असून राष्ट्रीय पात्रता परीक्षा ही उमेदवारांसाठी आहे. उमेदवारांसाठी असलेल्या अटी शिक्षकांवर लादणे सर्वस्वी गैर आहे.***

**मुख्यमंत्र्यांच्या स्तरावर लेखी ठरलेल्या (व समझोत्याचा भाग असलेल्या) गोष्टी एकतर्फी परस्पर 'डेस्क ऑफीसर'च्या स्तरावर बदलविण्याचा हा प्रकार अशोभनिय आहे.**

मंत्रिमहोदयांच्या समक्षच मी त्या अधिकाऱ्यांना असे सांगितले की, "विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यांचे १९.९.१९९१ चे नियम रद्द /निष्प्रभावित केलेले आहेत." त्यांना ते ऐकून धक्काच बसला. ते म्हणाले "कशावरून?" त्यावर मी त्यांना यु.जी.सीच्या ४ एप्रिल २००० च्या पत्रान्वये पाठविलेल्या रेग्युलेशनमधील पुढील पहिलेच वाक्य वाचून दाखविले :-

"In exercise of the powers conferred by clause (e) & (g) of sub-section (1) of Section 26 read with Section 14 of University Grants Commission Act, 1956 (3 of 1956), and in supersession of the Regulations issued under University Grants Commission letter No.F.1-93/74 (CPP) Part (v) dated 13th June,1983 and No.F.1-11/87 (CPP-II) dated 19th September,1991 and Notification No.1-93/74(CP) dated 19th February, 1985, 26th November, 1985 and No.F.3-1/94 (PS) dated 24th December, 1998, the University Grants Commission hereby makes the following regulations,"

हे वाक्य मी वाचून पुरे करीत नाही तर त्या अधिकाऱ्यांना दरदरून घाम सुटला. "तर मग ही अट आपण रद्द करून टाकू" असे वाक्य त्यांच्या तोंडून बाहेर पडले नाही. तर घामाने डबडबलेल्या त्या अधिकाऱ्याच्या तोंडून "मग आम्हाला आमच्या निवेदनातील ते वाक्य काढून टाकावे लागेल" असे उद्‌गार बाहेर पडले.

२६. नागपूर विधानभवनातील मा. उच्च शिक्षणमंत्र्यांच्या दालनात बी.टी.देशमुख व श्री. वसंतराव काळे यांच्या उपस्थितीत शासकीय अधिकाऱ्यांशी ही जी अनौपचारिक चर्चा झाली त्याची शेवटची फेरी लक्षवेधी सूचनेवर सभागृहात चर्चा झाली त्याच्या अगोदरच्या दिवशी पुन्हा झाली. त्या चर्चेला मा. शिक्षण सचिव उपस्थित होत्या. नाही म्हटले तरी मा. उच्च शिक्षण मंत्र्यांसमोर झालेली ती "सभ्य व सुसंस्कृत बाचाबाची"च होती.

(१) "पात्रता परीक्षा सन २००० हजार पर्यंत महाराष्ट्रात सक्तीची करण्यात आली नव्हती." असे आम्ही सांगितले; तर "१९.९.१९९१ ला युजीसीने नोटीफिकेशन काढले होते" असे त्या म्हणाल्या.

(२) "१९.९.१९९१ च्या नोटीफिकेशन मध्येच परिनियम करा असे म्हटले आहे **ते परिनियम महाराष्ट्रात आजपावेतो (डिसेंबर ९९) करण्यात आलेले नाही.** शिवाय युजीसीने आपलेच १९.९.१९९१ चे नोटीफिकेशन स्वतःच रद्द केले आहे." असे आम्ही म्हणालो; तर त्यावर "त्यांनी रद्द केले असेल पण आम्ही २३ ऑक्टोबर १९९२ च्या व २७ नोव्हेंबर १९९२ च्या शासननिर्णयाने ते लागू केले होते ते शासन निर्णय आम्ही रद्द केलेले नाही" असे त्यांनी सांगितले.

३) "महाराष्ट्रातील कायद्यानुसार विद्यापीठीय व महाविद्यालयीन **शिक्षकांच्या सेवाशर्ती (भरती पात्रतेच्या अटीसह) शासननिर्णयांनी ठरत नाहीत** तर त्या परिनियमांनी किंवा प्रमाणसंहितेने ठरतात." असे आम्ही सांगितले; तर त्यावर "हे परिनियम केले नाही ही विद्यापीठांची चूक आहे. आम्ही त्यांना कळविले होते" असे त्या म्हणाल्या.

४) "शासनाच्या हुकुमानुसार विद्यापीठांनी परिनियम केले नाही ही विद्यापीठांची चूक आहे किंवा नाही? यावर वाद होवू शकतो पण चूक आहे असे गृहीत धरले तरी **या चुकीची शिक्षा पूर्वलक्षी प्रभावाने या शिक्षकांना कशी काय देता येईल?**" या आमच्या म्हणण्यावर त्या काहीही बोलल्या नाहीत. त्यांच्यातर्फे दुसरे कुणीही काहीच बोलले नाही. उच्च शिक्षणमंत्री शांततेने ऐकत होते.

५) "परिनियम तयार न करण्यात विद्यापीठांनी चूक केली असे तुम्ही म्हणता तर मग "**विधीविधानाचा दर्जा नसलेले शासननिर्णय" काढत बसण्यापेक्षा "विधीवत प्रमाण संहिता" तुम्ही कां निर्गमित केली नाही?** यावर "१९९४ पूर्वी शासनाला तसे अधिकार नव्हते" असे त्या म्हणाल्या. यावर "१९९४ नंतर तरी निदान प्रमाणसंहिता कां निर्गमित नाही केली?" या प्रश्नाला त्यांच्याजवळ उत्तर नव्हते.

६) "१९९४ पूर्वी प्रमाण संहिता निर्गमित करण्याचे अधिकार शासनाला नव्हते हे तुमचे म्हणणे बरोबर नाही. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत तुम्ही १९८४ मध्ये प्रमाण संहिता निर्गमित केलेली आहे. त्यात पात्रतेच्या अटीसुद्धा आहेत." हे आम्ही सांगितले तर त्यावर "शिक्षकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत पात्रतेच्या अटी ठरविण्यासाठी प्रमाण संहिता निर्गमित करण्याचे अधिकार १९९४ पूर्वी शासनाला नव्हते." असे त्यांनी पुन्हा सांगितले. त्यावर "१९९४ पूर्वीच्या कायद्यामध्ये सुद्धा असे अधिकार होते." एवढेच आम्ही पुन्हा सांगितले. पुरावा आम्हाला देता आला नाही कारण १९९४ पूर्वीची विद्यापीठ कायद्याची पुस्तके सोबत घेऊन आम्ही त्या बैठकीला गेलेले नव्हतो. (हे पुरावे या लेखात परिच्छेद ११ मध्ये दिलेले आहेत)

७) "परीक्षेचे काम सक्तीचे करणारा कायदा आपण करू शकतो तर राष्ट्रीय पात्रता परीक्षा सक्तीची करणारा कायदा किंवा प्रमाणसंहिता शासन म्हणून आपण करू शकत नव्हतो यावर कोण विश्वास ठेविल?" असे आम्ही विचारले तर त्यावर त्यांच्याकडे उत्तर नव्हते.

८) शासननिर्णयांनी "पात्रता परीक्षा सक्तीची केली होती" असे तुम्ही म्हणता **तर मग हे १०-१२ हजार तरुण प्राध्यापक या व्यवसायात शिरले कसे? महाविद्यालयाच्या फाटकावरून उड्या मारून ते आत आलेत काय?** शासनाचे प्रतिनिधी निवड समितीत होते? नेटसेट नसलेला मनुष्य निवडला जात होता तेंव्हा हे नियमबाह्य कृत्य आहे हे त्यांच्या लक्षात आले नाही काय? त्यांना मान्यता मिळाल्या, वर्षानुवर्षे त्यांना वेतन व्यवस्थेतून वेतन नियमितपणे दिल्या जात आहे हे नियमबाह्य कृत्य जेडीच्या किंवा एओच्या, कोणाच्याच लक्षात आले नाही काय? असे कसे हे भोळे अधिकारी? या प्रश्नांची त्यांच्याकडे उत्तरे नव्हती.

२७. आमच्या चर्चेच्या शेवटी स्वतः मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी असे उद्‌गार काढले की, "**विद्यापीठाने किंवा शासनाने सक्तीचा नियम केला नाही त्यात त्या शिक्षकांचा काय दोष आहे? आपली चूक झाली आपण ती दुरुस्त केली पाहिजे. माझी खात्री झाली आहे. आता त्याप्रमाणे निवेदन तयार करा.**" अधिकारी मंडळीचे चेहरे कडवट झाले. तेव्हा एकदा तर मंत्री त्यांना म्हणाले "मी सभागृहात उद्या यांना कबूल करून टाकले म्हणजे मग तुम्ही काय कराल? तेव्हा तुम्हीच जरा व्यवस्थित निवेदन करा. सहानुभुतीचा दृष्टिकोन ठेवा." त्यावर मा. उच्च शिक्षण सचिवांनी भात्यातील ठेवणीतला बाण बाहेर काढला "मंत्रिमहोदय! वित्त विभागाशी सल्ला केल्याशिवाय ते आपल्याला करता येणार नाही" त्यावर "काय करता येईल ते पहा" असे उद्‌गार मंत्रिमहोदयांनी काढले. बैठक संपली.

२८. गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर २००० रोजी आमची लक्षवेधी सूचना सभागृहामध्ये चर्चेसाठी आली. शासनाच्या वतीने मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी १७ परिच्छेदाचे एक विस्तृत निवेदन सभागृहात वितरित केले होते. त्यापैकी पहिले १४ परिच्छेद या शिक्षकांना अनुकुल होते व न्याय देण्याकडे झुकणारे होते. शेवटचे तीन परिच्छेद मात्र पूर्णपणे विरुद्ध निर्णय देणारे होते. या शेवटच्या तीन परिच्छेदातील विषारी कुपी थोडी उघडून तिचे थोडेसे दर्शन घेणे आवश्यक आहे.

२९. मुळात मंगळवार, दिनांक २५ जुलै २००० रोजी मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी सभागृहात जे निवेदन वितरित केले होते त्याचा शेवट पुढील शब्दांनी केला होता. :-

"वरील तरतुदी लक्षात घेता व दिनांक १९.९.१९९१ च्या अधिसूचनेनुसार शिक्षक पदाकरिता नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण असणे ही आवश्यक अट असल्याने सेवेत असलेले बिगर अर्हताधारक अधिव्याख्याता नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण

**"विद्यापीठ अनुदान आयोगाने तदर्थ नियुक्त्या करणे, नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत वेतनवाढी रोखून ठेवणे, अपात्र अधिव्याख्यात्यांना जोपर्यंत ते पात्र ठरत नाहीत तोपर्यंतची त्यांनी सेवा वरिष्ठ श्रेणी वा निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरणे याबाबत वेगळे आदेश दिले नाहीत." - शासनाचे निवेदन**

***"या सर्व प्राध्यापकांना नेटसेटच्या अटीमधून वगळण्यासंबंधी मी अतिशय सुस्पष्ट अशी भूमिका या सभागृहामध्ये मांडलेली आहे. काही बाबींच्या संदर्भामध्ये वित्त विभाग आणि बाकीच्या विभागांचा खुलासा घ्यावा लागेल. तो घेतल्यानंतर ३ महिन्याच्या कालावधीमध्ये या प्रश्नाची सोडवणूक करण्याचे अभिवचन मी या ठिकाणी दिलेले आहे."***
***- मा. उच्च शिक्षण मंत्री - १४ डिसेंबर २०००***

नसल्याने या शिक्षकांना, त्यांच्या सेवा नियमित करणे, त्यांना वरिष्ठ श्रेणी/निवडश्रेणीचा लाभ देणे याचा लाभ देता येणार नाही."

शासनाची ही भूमिका आता बदलली होती. यामध्ये खरा दोष आमचाच होता (श्री.बी.टी.देशमुख व श्री. वसंतराव काळे) कारण आमच्याकडून पेपर फुटला होता. विद्यापीठ अनुदान आयोगाने आपले १९.९.१९९१ चे नियम रद्द केलेले आहे ही गोष्ट आम्ही अधिकाऱ्यांना अनौपचारिक चर्चेत सांगितली होती, त्याचा फायदा घेऊन अधिकाऱ्यांनी आता आपल्या लेखी निवेदनामध्ये बदल केला होता. मुळातल्या त्या रद्दी परिच्छेदावरची धूळ झटकून त्यांच्या तोंडाला पावडर वगैरे लावून तोच परिच्छेद डेकोरेट करून गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर २००० रोजीच्या मंत्रिमहोदयांच्या लेखी निवेदनांत १५ वा परिच्छेद म्हणून टाकलेला होता तो पुढील प्रमाणे :-

"१५. जुनी प्रक्रिया विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १९९१ च्या अधिसूचनेव्दारे पुनःस्थापित (Replace) करण्यात आली असून ती शासन निर्णय दिनांक २३/१०/९२ व २७/११/९२ अन्वये सर्व विद्यापीठांना कळविण्यात आली आहे. त्यामुळे १९९१ नंतर सेवेत आलेले सर्व अनर्हताधारक अधिव्याख्यात्यांच्या नियुक्त्या नियमित स्वरुपात नसल्याने त्यांना दिनांक ४ एप्रिल, २००० चे विनिमय लागू होत नाहीत. त्यामुळे या तदर्थ अधिव्याख्यात्यांना नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे."

राष्ट्रीय पात्रता परीक्षा सक्तीची करण्यासाठी **युजीसी रेग्युलेशन हे** विधिमय माध्यम नसल्यामुळे गेले ८-१० वर्षे त्याप्रमाणे 'परिनियम करा' असे विद्यापीठ अनुदान आयोग शासनाला सांगत आहे. **शासननिर्णय हे पात्रता परीक्षा सक्तीची करण्याचे विधिमय माध्यम नाही** हे उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांना कुणी सांगावे.?

**३०.** शिक्षकांवर अन्याय करणाऱ्या त्यांच्या निवेदनातील १५,१६ व १७ या परिच्छेदापैकी परिच्छेद १५ वर दिलेला आहे. लेखी निवेदनातील परिच्छेद १६ व १७ पुढील प्रमाणे :-

"१६. दिनांक १४ जुलै, १९९४ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील अकृषी विद्यापीठातील व महाविद्यालयातील अधिव्याख्यांताकरिता नेट परीक्षा ही प्रादेशिक भाषेतून घेण्याबाबतचा प्रश्न विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहकार्याने सोडविण्यात आला असून त्यायोगे पुणे विद्यापीठाने राज्यस्तरीय पात्रता परीक्षा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या संमतीने व त्यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार घेण्यात याव्यात, असे आदेश देण्यात आले. पुणे विद्यापीठामार्फत त्यानुसार १९९५ पासून सेट परीक्षा घेण्यात येतात. सन १९९१ पासून आतापर्यंत विद्यापीठ अनुदान आयोग व पुणे विद्यापीठामार्फत घेण्यात आलेल्या राष्ट्रीय पात्रता परीक्षा व राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (नेट/सेट) उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची संख्या सुमारे ७,४०० इतकी आहे.

१७. वरील वस्तुस्थितीवरुन राज्यात पुरेशा प्रमाणात अर्हताधारक उमेदवार उपलब्ध होत असल्यामुळे सन १९९१ नंतर सेवेत आलेल्या अनर्हताधारक अधिव्याख्यात्यांना नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे."

कोणत्या परीक्षेला किती विद्यार्थी बसतात त्यापैकी कीती पास होतात. ही वर्षनिहाय संख्या या एकंदर वादाशी गैरलागू आहे हे एक व दुसरे म्हणजे आज पुरेसे उमेदवार उपलब्ध आहेत म्हणून काल भरती झालेल्या शिक्षकांना वेठीस धरणे व तशी व्यवस्था अगोदरच करण्याची ज्यांची जबाबदारी होती व ज्यांनी ती पार पाडली नाही त्यांचे विनाकारण कौतुक करणे हे अनाठायी आहे. यापेक्षा जास्त याबाबत काहीही सांगण्यासारखे नाही.

**३१.** या शिक्षकांवर अन्याय झालेला आहे ही गोष्ट त्यांच्या दालनामध्ये झालेल्या अनौपचारिक चर्चेत मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी मान्य केली होती ती त्यांनी सभागृहातील चर्चेमध्ये सुद्धा मान्य केली व अडचण सुद्धा सांगितली ती पुढील शब्दात :-

"म्हणून या संदर्भामध्ये सन्माननीय सदस्यांनी जी भावना व्यक्त केलेली आहे. त्या संदर्भाने तपासावे लागेल. त्यांची प्रमोशन्स थांबविण्याबाबत जे काही निर्णय घेतलेले असतील, यांच्याशीसुध्दा वित्त विभागाचा संबंध असल्यामुळे वित्त विभागाची मान्यता घेऊनच-शेवटी यामध्ये फायनान्शियल बोजा किती वाढणार आहे.... शेवटी यामध्ये वित्तीय बर्डन वाढणार आहे आणि वित्तीय बर्डन वाढते त्या त्या वेळेला वित्त विभागाची संमती घेतल्याशिवाय असा सो मोटो डिसिजन घेता येणार नाही. **परंतु ज्या ज्या कर्मचारी आणि शिक्षकांवर अन्याय झालेला आहे त्या शिक्षकांवरील अन्याय दूर करण्याची भूमिका राज्यशासनाची राहील** आणि या संदर्भामध्ये विचार विनिमय करुन निश्चित वेळेमध्ये या प्रश्नाच्या सोडवणुकीच्या संदर्भामध्ये मी या ठिकाणी वचनबध्द आहे."

**३२.** मा. उच्च शिक्षणमंत्र्यांना वित्त विभागाच्या खोड्यात कारण नसतांना अडकविले गेले होते. त्यावर मात करुन मंत्रिमहोदयांनी तीन महिन्यात याबाबतचा निर्णय करु असे ठाम आश्वासन सभागृहात दिले ते पुढील शब्दात :-

"या सर्व प्राध्यापकांना नेटसेटच्या अटीमधून वगळण्यासंबंधी मी अतिशय सुस्पष्ट अशी भूमिका या सभागृहामध्ये मांडलेली आहे. काही बाबींच्या संदर्भामध्ये वित्त विभाग आणि बाकीच्या विभागांचा खुलासा घ्यावा लागेल. **तो घेतल्यानंतर ३ महिन्याच्या कालावधीमध्ये या प्रश्नाची सोडवणूक करण्याचे अभिवचन मी या ठिकाणी दिलेले आहे."**

**३३.** वित्त विभागाचा बागुलबोवा उच्च शिक्षण सचिवांनी अगोदरच्या दिवशीच्या अनौपचारिक चर्चेतच उभा केला होता, तो सभागृहात सुद्धा आला. याबाबत सुद्धा एकदा उच्च शिक्षण मंत्र्यांनी आपल्या दालनांत ज्येष्ठ अधिकाऱ्यांना बोलावून खालील मुद्यांची माहिती मिळवून घेतली पाहिजे :-

(१) मा. मुख्यमंत्री, मुख्य सचिव, उच्च शिक्षणमंत्री, वित्तसचिव, उच्च शिक्षण सचिव यांनी सतत पाच दिवस, पाच पाच तास बसून काही ठाम निर्णय घेतले त्या बैठकीमध्ये ठामपणे घेण्यात आलेला एक महत्वाचा निर्णय पुढील प्रमाणे :-

"The Government of India's suggestions on revision of pay scales for teachers in Universities and Colleges dated 17th June, 1987 as amended by subsequent agreement dated 4th and 5th Sept., 1987 and Govt. of India's suggestions dated 22nd July, 1988, would be implemented by the State Government with the recommended scales of pay, including the element of promotion involved therein as a composite scheme w.e.f. 1.1.1986 "

(२) हे ठरले त्याला वित्त विभागाची मान्यता होती की नाही?

(३) एकदा केंद्र शासनाच्या सूचनेप्रमाणे करण्याचे ठरल्यावर व त्याला वित्त विभागाची स्पष्टपणे मान्यता असल्यावर व त्याप्रमाणे २७.२.१९८९ चा शासननिर्णय निर्गमित झाल्यावर केंद्राच्या अटीमध्ये नसलेल्या गोष्टी तुम्ही महाराष्ट्रातल्या अधिकाऱ्यांनी घुसडल्या, त्या मागे घेण्यासाठी वित्त विभागाची मान्यता घेणे याचा अर्थ काय होतो?

(४) ३१ मार्च १९९४ ला त्यांना सेवामुक्त करा ही अट केंद्राची होती का? ३१ मार्च १९९५ ला त्यांना सेवामुक्त करा ही अट केंद्राची होती का?

***"परंतु ज्या ज्या कर्मचारी आणि शिक्षकांवर अन्याय झालेला आहे त्या शिक्षकांवरील अन्याय दूर करण्याची भूमिका राज्यशासनाची राहील आणि या संदर्भामध्ये विचार विनिमय करुन निश्चित वेळेमध्ये या प्रश्नाच्या सोडवणुकीच्या संदर्भामध्ये मी या ठिकाणी वचनबध्द आहे."***
***- मा. उच्च शिक्षण मंत्री - १४ डिसेंबर २०००***

***"वरील तरतुदी लक्षात घेता व दिनांक १९.९.१९९१ च्या अधिसूचनेनुसार शिक्षक पदाकरिता नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण असणे ही आवश्यक अट असल्याने सेवेत असलेले बिगर अर्हताधारक अधिव्याख्याता नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण नसल्याने या शिक्षकांना, त्यांच्या सेवा नियमित करणे, त्यांना वरिष्ठ श्रेणी/निवडश्रेणीचा लाभ देणे याचा लाभ देता येणार नाही." - शासनाचे निवेदन***

***विद्यापीठ अनुदान आयोगाने १९.९.१९९१ ची अधिसूचना रद्द केली तरी शासनाची भूमिका कायमच***

३१ मार्च १९९६ ला त्यांना सेवामुक्त करा ही अट केंद्राची होती का? त्यांना ॲडहॉक नेमणूका द्या हे केंद्राने सांगितले होते काय? त्यांच्या वेतनवाढी रोखून ठेवा हे केंद्राने सांगितले होते काय? त्यांना वरिष्ठ जागावर प्रमोशन देऊ नका हे केंद्राने सांगितले होते काय? त्यावेळच्या मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी शुक्रवार, दिनांक ३ एप्रिल १९९८ रोजी सभागृहात लेखी निवेदनामध्ये ही गोष्ट मान्य केली की :-

**"विद्यापीठ अनुदान आयोगाने तदर्थ नियुक्त्या करणे, नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत वेतनवाढी रोखून ठेवणे, अपात्र अधिव्याख्यात्यांना जोपर्यंत ते पात्र ठरत नाहीत तोपर्यंतची त्यांनी सेवा वरिष्ठ श्रेणी वा निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरणे याबाबत वेगळे आदेश दिले नाहीत."** *(महाराष्ट्र विधानपरिषद, कार्यवाही, शुक्रवार, दिनांक ३ एप्रिल १९९८, कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड ११४, क्रमांक १५ पृष्ठ ६९)*

३४. केंद्राच्या सूचनेप्रमाणेच करण्याचे मा. मुख्यमंत्र्यांच्या स्तरावर लेखी ठरल्यानंतर केंद्राने सूचना दिल्या नाही तरी या अटी टाकल्या हे सभागृहात कबुल केले जाते आणि ह्या अटी लादणारे मोकाट फिरत रहातात हा काय न्याय आहे? **विद्यापीठात किंवा महाविद्यालयात शिक्षक म्हणून काम करणाऱ्या या शिक्षकाला आपल्या व्यावसायीक जिवनाची उमेदीची सुरुवातीची १०-१२ वर्षे अशी मानसिक तेजोभंगाच्या सावलीत घालवावी लागतात याची शैक्षणिक किंमत ज्यांना कळत नाही अशा अधिकाऱ्यांच्या हाती जामदारखान्याच्या चाव्या असल्याने घडत असलेले व घडणारे महाभारत टाळता येण्यासारखे आहे.** केंद्र शासनाच्या अटीप्रमाणे करण्यास वित्त विभागाने पूर्वीच मान्यता दिलेली आहे. त्या सूचनामध्ये नसलेला जो "मसाला" उच्च शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी भरला तो मागे घेण्यासाठी आम्हाला वित्त विभागाची मान्यता पाहिजे असे उच्च शिक्षणमंत्र्यांना अधिकाऱ्यांनी सांगणे म्हणजे मोठाच द्राविडीप्राणायाम आहे.

३५. काटेकोरपणे व नियमाप्रमाणे काम करण्यात क्षेत्रीय अधिकाऱ्यांचे लाभालाभ पत्रक विघडून जाते. त्यातील काहींना एखादी गोष्ट सक्तीची करून टाकली की मागेपुढे करायला जागा रहात नाही. त्यामुळे आम्ही म्हटले तर नेटसेट सक्तीची आहे. म्हटले तर ती सक्तीची नाही असा प्रेमाचा मामला वर्षानुवर्षे चालू ठेवण्यात क्षेत्रीय अधिकाऱ्यांना स्वर्गसुखाचा आनंद होतो. जाईन्ट डायरेक्टरच्या कार्यालयात काम करणाऱ्या प्रशासन अधिकाऱ्यांच्या लॉकरमध्ये एसीबीच्या अधिकाऱ्यांना १३ लाख रुपये उगाच सापडत नाहीत. मी ही गोष्ट बाहेर बोलतो असे नाही सभागृहात सुद्धा हे मी सांगितलेले आहे.

३६. नेटसेट गेल्या १०-१२ वर्षात कोणीही सक्तीची केली नाही ती मा. श्री. दिलीप वळसे पाटील उच्च शिक्षण मंत्री झाल्यावरच सक्तीची करण्यात आली. ती सक्तीची झाल्यानंतर सुद्धा नखऱ्यात पाय टाकणाऱ्या अधिकाऱ्यांचे नखरे चालू देणार नाही अशी ठाम भूमिका सुद्धा त्यांनी घेतली आहे. यापूर्वी "सक्ती करणारा कायदा प्रथम करू व मग कोणालाही अपवाद करणार नाही" अशी भूमिका गेल्या १०-१२ वर्षात कुणीही घेतली नव्हती. सभागृहामध्ये त्यांनी आपली ही भूमिका ठामपणे पुढील शब्दात जाहीर केली :-

"पाचवा वेतन आयोग लागू केलेला आहे **त्यानंतरच्या काळामध्ये १९९९ मध्ये डायरेक्शन्स काढल्या आहेत. त्या अशा की,९९ नंतर कोठल्याही महाविद्यालयामध्ये, कुठल्याही विद्यापीठामध्ये नेटसेटच्या शिवाय कोणत्याही शिक्षकाची भरती झाली तर ती भरती आम्ही ग्राह्य धरणार नाही. ज्यांनी ही भरती केली असेल ते दोषी असतील आणि ते कारवाईस पात्र राहतील. अशा स्पष्ट सूचनासुध्दा मी या ठिकाणी देत आहे."**

त्यांच्या या भूमिकेला उच्च शिक्षणाचे हितचिंतन करणाऱ्या प्रत्येकाने ठामपणे पाठिंबा देण्याची आवश्यकता आहे.

३७. "शिक्षक म्हणून सेवेत येणारी व्यक्ती नेटसेटची पात्रताधारक असली पाहिजे" असा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या एप्रिल २००० च्या रेग्युलेशनमधील मूळ नियम आहे. "परंतु असे की त्या त्यावेळी अस्तित्वात असलेली किमान विधिमय पात्रता धारण करणाऱ्या ज्या शिक्षकांची यथोचित निवड समितीमार्फत यापूर्वीच निवड झालेली आहे अशा शिक्षकांना "नेटसेट पात्रता" लागू असणार नाही" असे त्या नियमाचे परंतुक आहे. **मूळ नियमात "नेटसेटची पात्रता" आवश्यक आहे. तर परंतुकामध्ये "हे नियम होण्याच्यापूर्वी त्या त्यावेळी अस्तित्वात असलेली किमान विधिमय पात्रता" धारण करणारांना नेटसेटची पात्रता लागू रहाणार नाही असे विहित केले आहे. मूळ नियमातील पात्रता व परंतुकातील पात्रता म्हणजे दोनही ठिकाणी "नेटसेटचीच पात्रता" असा अर्थ मंत्रालयातील अधिकारी लावत आहेत. आपलाच अर्थ खरा आहे या आनंदात ते एवढे बेभान झाले आहेत की दोनही ठिकाणच्या पात्रतेचा अर्थ जर "नेटसेटची पात्रता" असाच आहे हे मान्य केले तर विद्यापीठ अनुदान आयोगाने आपल्या मूळ नियमाला हे परंतुक जोडण्याचे काही कारणच उरत नाही याचेही भान या अधिकाऱ्यांना राहिलेले नाही.**

३८. एक म्हणजे सेवेत भरती झाले त्यावेळी विधिवतरित्या विधिमय माध्यमांनी ठरवून दिलेली त्यावेळची किमान पात्रता ते धारण करीत होते किंवा नाही? या प्रश्नाचे प्रामाणिक उत्तर मंत्रालयातील एखाद्या अधिकाऱ्यानी जरी देतो म्हटले तरी हा प्रश्न सहज सुटू शकेल.

दुसरे म्हणजे एकदा केंद्राच्या सूचनेप्रमाणे करण्याचे उच्चतम राजकीय नेतृत्त्वाच्या पातळीवर ठरल्यानंतर व त्याला वित्तविभागाची मान्यता मिळाल्यानंतर केंद्राच्या सूचनांमध्ये नसलेल्या ज्या "काड्या" मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी करून ठेवल्या त्या "काड्या" परत मोडून काढण्यासाठी, उच्च शिक्षण मंत्र्यांनी, मंत्रिमंडळाने, महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने, यापूर्वी झालेल्या तीन पत्र आंदोलनांनी किंवा पुढे होणाऱ्या संभाव्य तीव्र आंदोलनाने त्यांना मदत करावी हा मोठाच कौतुकाचा भाग म्हणावा लागेल. **शासनाच्या सर्वोच्च पातळीवर ठामपणे लिखित निर्णय करून दिल्यावर वर्षानुवर्षे जे करायला पाहिजे ते करणार नाही व जे करायला नको ते केल्याशिवाय रहाणार नाही या स्वरुपाच्या कारकुनी कारवायांच्या उलटसुलट कवायतींनी उच्च शिक्षणाचे सारे क्षेत्रच वेठीला धरल्याचे जे चित्र त्यातून निर्माण होत आहे ते मन विषण्ण करणारे आहे.**

**बी.टी.देशमुख,**
विधानपरिषद सदस्य

दिनांक : ५.३.२००१

******

**NUTA BULLETIN** (Fortnightly Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Prof. A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. S.R. Kalmegh Lahari Apartment, Keshao Colony, Camp, AMRAVATI 444 602. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Offset, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO. ATI 263** Licenced to post without prepayment **LICENCE NO. ATI 10** Name of the Posting office : **R.M.S. Amravati.**
Date of Posting : **17.03.2001**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

To,........................................................
..............................................................
..............................................................
..............................................................
..............................................................